लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ च्या महसुली जमा अहवालामधील महसूल विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.२.३) गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३.२) व गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.६.१) यावरील

तेहतिसावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक मार्च २०१८ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
फेब्रुवारी/मार्च २०१८

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ च्या महसुली जमा अहवालामधील महसूल विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.२.३) गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३.२) व गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.६.१) यावरील

तेहतिसावा अहवाल

एच ३०४३—१

लोकलेखा समिती

२०१७-२०१८

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

(*२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

निमंत्रित :

(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन **भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११- २०१२ च्या महसुली जमा अहवालामधील महसूल विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.२.३), गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३.२) व गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.६.१)** यावर विचार करून लोकलेखा समितीचा तेहतिसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ७, १५ व २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी अपर मुख्य सचिव, गृह (परिवहन) व गृह (राज्य उत्पादन शुल्क) तसेच प्रधान सचिव, महसूल व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक, महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन, महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट 'अ' मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ व दिनांक ६ मार्च, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशींवर सुधारणा सुचवून प्रारूप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई/नागपूर,
दिनांक ६ मार्च २०१८.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अ. क्र.	विभाग व तपशील	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
	प्रस्तावना	
(१)	**महसूल विभाग** कृषीतर दराऐवजी कृषी दर लावल्यामुळे भोगवटा मुल्याची कमी आकारणी (परिच्छेद क्र. ४.२.३)	१
(२)	**गृह (परिवहन) विभाग** आयात वाहनांवरील एकरकमी कराची (OTT) कमी आकारणी (परिच्छेद क्र. ५.३.२)	२४
(३)	**गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग** चुकीचा लोकसंख्येचा स्तर लागू करण्यामुळे अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली (परिच्छेद क्र. ५.६.१)	३१

महसूल व वन (महसूल) विभाग

१. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-१२ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ४.२.३. " कृषीतर दराऐवजी कृषी दर लावल्यामुळे भोगवटा मूल्यांची कमी आकारणी " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले,–

१.१ परिच्छेद क्र. ४.२.३ कृषीतर दराऐवजी कृषी दर लावल्यामुळे भोगवटा मूल्यांची कमी आकारणी :

१.२ परिच्छेद क्र. ४.२.३.१ कृषीतर दराऐवजी कृषी दर लावल्यामुळे भोगवटा मूल्यांची कमी आकारणी :

महाराष्ट्र जमीन महसूल (एम एल आर) संहिता, १९६६ च्या तरतुदीनुसार राज्य शासनाला त्यांच्या मालमत्तेची विल्हेवाट त्यांना योग्य वाटणाऱ्या शर्ती व अटींवर करण्याकरिता अधिकार प्रदान केले आहेत. दिनांक ८ जुलै १९९९ च्या शासन ठरावानुसार व्याजाची आकारणी प्रधान सावकारी दाराने अंतिम भोगवटा मुल्य कळविण्याच्या तारखेपासून भरणा केल्याच्या तारखेपर्यंत, केला जाईल. शिवाय, अंतिम भोगवटा मूल्य जमिनीचे वाटप करण्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त १२ महिन्यांत निर्धारित केले पाहिजे.

जमीन देण्याची प्रकरणे आणि संबंधित अभिलेख यांच्या चाचणी तपासणीत आम्हाला असे आढळून आले की, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील प्रतिष्ठानला तहसिल, अहमदनगर ३०.६१७४ हेक्टर जमिनीचा, शैक्षणिक हेतू करिता आगाऊ ताबा दिला गेला (जानेवारी, १९८७), शासनाने, प्रचलित बाजार मूल्यावर आधारलेले अंतिम भोगवटा मूल्य निर्धारित करेपर्यंत, रु. ४०.०९ लाख या तात्पुरत्या भोगवटा मूल्यांच्या भरणानंतर जमीन वाटपाकरता मंजुरी दिली (जुलै, २००५), जिल्हाधिकारी यांनी कृषी दर लाऊन रु. १.१९ कोटी भोगवटा मूल्य रु. ८५.६४ लाख व्याजासह वसूल केले आणि जुलै, २०१० मध्ये वाटपाचे अंतिम आदेश निर्गमित केले.

जमिनीचे बाजार मूल्य २००५ च्या कृषीतर दराप्रमाणे रु. ६.२० कोटी होते व जमीन कृषीतर उपयोगासाठी वाटप केल्यामुळे तो दर लावावयास पाहिजे होता. सह. जिल्हा निबंधक, अहमदनगर यांना देखील हे जागेचे बाजार मूल्य रु. ६.२० कोटी इतके कळविले होते. परंतु, जिल्हाधिकारी यांनी ते विचारात घेतले नाही याचा परिणाम रु. ५.०१ कोटी इतक्या भोगवटा मूल्याच्या कमी आकारणीत झाला.

आम्ही हे निदर्शनास आणल्यानंतर (सप्टेंबर, २०११) विभागाने व शासनाने मान्य केले की, भोगवटा मूल्याची आकारणी कृषीतर हेतूकरिता लागू असणारा दर विचारात घेऊन करावयास हवी होती.

१.३ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.–

मौजे वडगाव गुप्ता गट नं.५९५ पैकी १६ हे. १८.७४ आर गट नं.५९६ पैकी क्षेत्र ६ हे ९४ आर गट.नं. ६०१ पैकी क्षेत्र ०७ हे ४९ आर एकूण ३० हे. ६१.७४ आर क्षेत्राचा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील पत्र दिनांक २३/१/८७ अन्वये डॉ. पद्मश्री विखे पाटील फाऊंडेशन यांना आगाऊ ताबा देण्यात आला होता. सदरचे क्षेत्र महसूल व वन विभाग, ज्ञापन दिनांक ११/७/२००५ अन्वये पद्मश्री विखेपाटील फाऊंडेशन यांना महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींचे वितरण) नियम १९७१ चे नियम ५ व ६ मधील तरतुदीनुसार अभियांत्रिकी व इतर सर्व विनाअनुदानित असलेल्या शैक्षणिक उपक्रमासाठी चालू बाजारभावाची किंमत आकारून तात्पुरती किंमत ४०,०८,८१९ अटी व शर्तीवर शैक्षणिक प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले.

उक्त जमिनीचे सन २००५ चे मूल्यांकन सह. जिल्हा निबंधक, वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडून मागविण्यात आले होते. सह. जिल्हा निबंधक, वर्ग १, अहमदनगर यांनी सहा. संचालक नगररचना व मूल्यांकन विभाग, नाशिक यांच्या अभिप्रायानुसार दिनांक १४/५/२०१० रोजीचे पत्रान्वये उक्त जमिनीचे मूल्यांकन ३२,८८,००० निश्चित केले.

शासन ज्ञापन दिनांक ११/७/२००५ मधील अटीनुसार कब्जाहक्क रक्कम रु. ३२,८८,००० व्याज ८५,६४,५४२ एकूण १,१८,५२,५४२ वसूल करून प्रश्नाधीन जागा आदेश दिनांक ३०/०७/२०१० अन्वये शैक्षणिक प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली.

तद्नंतर लेखापरिक्षणात कब्जाहक्क रक्कम रु. १५,३८,६३,७४० व त्यावर व्याज रु. ४२,९४,४५,२०८ एकूण रक्कम रु. ५८,३३,०८,९४८ आकारणी कमी वसूल झालेबाबत शक घेण्यात आला. त्यानुसार जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी महालेखापाल (ऑडीट लेखापरिक्षण) -२, नागपूर यांना सादर केलेल्या अहवालावर महालेखापाल, नागपूर यांनी दिनांक २१/९/२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव (महसूल) यांचे अभिप्राय मागविले. त्यावर विभागाच्या पत्र दिनांक १५/११/२०११ अन्वये मौजे वडगांव गुप्ता, ता. नगर, जि. अहमदगगर येथील डॉ. पद्मश्री विखेपाटील फाऊंडेशनसाठी सन २००५ च्या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या जमिनीचे मूल्यांकन, सन २००५ या वर्षाच्या जमिनीचे अकृषिक दराने होणारे मुल्यांकन विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच व्याजाची आकारणीदेखील शासन निर्णय दिनांक ०८/०७/१९९९ च्या

तरतुदीनुसार अंतिम मुल्यांकन कळविले. नंतर ती रक्कम भरण्याची नोटीस दिल्यापासून संस्थेने भरलेली तात्पुरती रक्कम वजा करून राहिलेल्या रकमेवर व्याज आकारणे आवश्यक असल्याचे नमूद करून परिच्छेद वगळणेबाबत मा. महालेखाकार (लेखापरिक्षा) II, महाराष्ट्र शासन लेखा भवन, नागपूर यांना अहवाल सादर केला होता.

मा. वरिष्ठ लेखापरिक्षा अधिकारी यांनी पत्र दिनांक २१/६/२०१२ अन्वये शासनाने सादर केलला अहवाल मान्य करून परिच्छेद क्र. १ मध्ये दुरूस्ती करून रक्कम रु. ५,०१,०७,४५८ कमी आकरणीबाबत शक घेतलेला आहे. त्यानुषंगाने विभागाच्या पत्र दिनांक १७.१०.२०१२ अन्वये महालेखा परिक्षक यांच्या सन २०११-२०१२ च्या अहवालातील प्रारुप परिच्छेदामधील वसुली करण्याबाबत कळविण्यात आले.

सचिव, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटील फाऊंडेशन, यांना जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या कार्यालयाकडील पत्र दिनांक २०/११/२०१२ तसेच दिनांक ६/५/२०१३ अन्वये रक्कम रु. ०५,०१,०७,४५८ सरकारजमा करणेबाबत कळविले. तसेच, तहसीलदार, नगर यांनी दिनांक ०६/१२/२०१२ व दिनांक १६/११/२०१३ रोजी सचिव, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटील फाऊंडेशन, विळदघाट, अहमदनगर यांना रक्कम रु. ०५,०१,०७,४५८ सरकार जमा करणेबाबत कळविले आहे. तसेच रक्कम रु. ५.०१ कोटी रुपये सरकारजमा करणेबाबत संस्थेस दिनांक १८/०१/२०१४ अन्वये कसूरदारास मागणी नोटिस बजावली आहे.

उक्त नोटीशीचे अनुषंगाने सचिव, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटील फाऊंडेशन, विळदघाट, अहमदनगर यांनी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटिशन ८४२/२०१४ दाखल केली होती. त्यात मा. उच्च न्यायालयाने दिनांक २८/४/२०१५ रोजी आदेश पारित केलेला असून उक्त आदेशातील परिच्छेद ११ नुसार वादी यांना सुनावणीची संधी देऊन निर्णय घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडील पत्र दिनांक ११/१/२०१६ अन्वये तहसीलदार, नगर यांना कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तहसिलदार, नगर यांनी प्रकरणी सुनावणी घेतली असून पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, अहमदनगर ही संस्था रक्कम रु. ०५,०१,०७,४५८ शासकीय खजिन्यात भरणा करणेस तयार नसल्याचे कळविले आहे. प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने कार्यवाही करून रक्कम वसुलीबाबत कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडील दिनांक ८/११/२०१७ च्या पत्रान्वये तहसीलदार, नगर यांना पुन्हा कळविण्यात आले आहे. प्रकरणी त्यांच्या स्तरावरुन कार्यवाही सुरू असून अंतिम अहवाल सादर करण्याची दक्षता घेत आहोत.

विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने महालेखाकारांनी खालील अभिप्राय नोंदविले.

मा. उच्च न्यायालयाकडील दिनांक २८/४/२०१५ रोजीच्या आदेशाची प्रत मा. लोकलेखा समितीस पुरविण्यात यावी. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटील फाऊंडेशन यांच्याकडून मागणी रकम वसूल करणेबाबत जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या मार्फत केलेली कार्यवाही मा. लोकलेखा समितीस सादर करण्यात यावी.

१.४ परिच्छेद क्र. ४.२.३.२ कृषीतर दराऐवजी दर लावल्यामुळे भोगवटामुल्याची कमी आकारणी :

मे, २००६ मध्ये निर्धारित केलेल्या शासन ठरावानुसार, भोगवटा तत्त्वावर किंवा भाडेपट्टा तत्त्वावर शासकीय जमिनीचे वाटप करण्याकरिता आणि जेथे शासकीय जमिनीचे मुल्यांकन करावयाचे आहे अशा सर्व प्रकरणांमध्ये, मुल्यांकन, ASR मध्ये ज्या तारखेला शासकीय जमिनीच्या वाटपाचे आदेश दिले गेले त्या तारखेला विहीत केलेल्या दरांप्रमाणे किंवा मुल्यांकन करण्याकरिता झालेल्या इतर आदेशाप्रमाणे ठरविले जाईल. ASR च्या अनुदेशानुसर जर ग्रामीण क्षेत्रात असलेली शासकीय जमीन कृषितर कारणाकरिता वाटप केली गेली, तिचे बाजार ASR मध्ये त्या प्रांतांकरिता विहित केलेल्या कृषितर दराच्या ५० टक्के दराप्रमाणे ठरविले जाईल.

पाच जिल्हाधिकारी कार्यालयातील जमीन वाटपांच्या प्रकरणांच्या चाचणी तपासणीत आम्हाला जानेवारी, २००७ आणि जून, २०१० या दरम्यान असे आढळून आले की, ७७ प्रकरणांपैकी ११ प्रकरणात शासकीय जमिनीचे वाटप कृषितर हेतूकरिता जसे शाळा, महाविद्यालाये, नवीनीकरण करण्याजोगे ऊर्जा प्रकल्प, वीज प्रकल्प, साखर कारखाने व इतर वाणिज्यिक हेतूकरिता केले गेले आणि आकारणी केले गेलेले एकूण भोगवटा मूल्य रु. ७.६५ कोटी होते जे कृषितर दरा ऐवजी, दरांच्या वार्षिक विवरणपत्रांत विहीत केलेल्या कृषिदराप्रमाणे होते. कृषितर दर लावून भोगवटा मूल्य रु. ३९.७६ कोटी इतके निघते. याप्रकारे, अनुदेशांचे पालन न करण्याचा परिणाम रु. ३२.११ कोटी एवढ्या भोगवटा मुल्याच्या कमी आकारणीत झाला.

आम्ही हे निदर्शनास आणून दिल्यानंतर तीन जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की, ही बाब पडताळली जाईल आणि दोन जिल्हाधिकाऱ्यांनी नमुद केले की, भोगवटा मुल्य आकारण्याआधी धारकांनी बाजार मुल्य उप निबंधकांकडून तपासून घेतले होते. त्यामुळे भोगवटा मुल्य बरोबर वसूल केले गेले. हे उत्तर बरोबर नाही कारण उप निबंधकांनी कळविलेले दर वार्षिक विवरणपत्रातील दरापेक्षा कमी होते आणि भोगवटा मूल्याची आकारणी दरांच्या वार्षिक विवरणपत्राशी तपासुन पहावयास हवे होते.

आम्ही ही बाब शासनाला ऑगस्ट, २०१२ मध्ये कळविली. शासनाने नमुद केले (ऑक्टोबर, २०१२) की नाशिक जिल्ह्यातील दोन प्रकरणात वसुली सूचना निर्गमित केली गेली आहे. इतर प्रकरणात त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१३).

१.५ ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

याबाबत संबंधित जिल्ह्यांची स्पष्टीकरणात्मक ज्ञापने सोबत जोडली आहे.

१.६ परिच्छेद क्र. ४.२.३.२ कृषीतर दराऐवजी दर लावल्यामुळे भोगवटामुल्याची कमी आकारणी :

मे, २००६ मध्ये निर्धारित केलेल्या शासन ठरावानुसार, भोगवटा तत्त्वावर किंवा भाडेपट्टा तत्त्वावर शासकीय जमिनीचे वाटप करण्याकरिता आणि जेथे शासकीय जमिनीचे मुल्यांकन करावयाचे आहे अशा सर्व प्रकरणांमध्ये, मुल्यांकन, ASR मध्ये ज्या तारखेला शासकीय जमिनीच्या वाटपाचे आदेश दिले गेले त्या तारखेला विहित केलेल्या दरांप्रमाणे किंवा मुल्यांकन करण्याकरिता झालेल्या इतर आदेशाप्रमाणे ठरविले जाईल. ASR च्या अनुदेशानुसर जर ग्रामीण क्षेत्रात असलेली शासकीय जमीन कृषितर कारणाकरिता वाटप केली गेली, तिचे बाजार ASR मध्ये त्या प्रातांकरिता विहित केलेल्या कृषितर दराच्या ५० टक्के दराप्रमाणे ठरविले जाईल.

पश्चिम रेल्वे यांना मौजे उमेळमान, ता. वसई येथील स. नं. १०१ अ मधील क्षेत्र १५८१२.३५ चौ.मी. बोरिवली-विरार रेल्वे मार्गासाठी वाटप करताना १,७८,१२,३५० भोगाधिकार मूल्य वसूल करण्याऐवजी रु. १,०६,७३,३३६ आकरण्यात आल्यामुळे शासनास रु. ७१,३९,०१४ इतक्या महसूलाचे नुकसान झाले. प्रकरणी दुय्यम निबंधक यांचेकडून दर्शविलेले दर (ASR) पेक्षा कमी असल्याने प्रकरणी (ASR) मधील दरानुसार वसुली होणे आवश्यक आहे.

१.७ ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.—

पश्चिम रेल्वे यांना दिनांक २८/७/२००० रोजी रक्कम रु. १,०६,७३,३३६ भरुन घेण्यात येऊन मौजे उमेळमान, ता. वसई येथील स. नं. १०१ अ मधील क्षेत्र १५८१२.३५ चौ.मी. चा आगाऊ ताबा देण्यात आला. दुय्यम निबंधक, वसई यांनी सन २००० च्या शिघ्रसिद्धगणकानुसार जिल्हाधिकारी यांना कळविलेल्या नागरीक्षेत्रातील जमिनीचे बिनशेती बाजारदराचे आधारे (रु. ६७५ प्रती चौ.मी.) उक्त रक्कम आकारण्यात आली आहे. तद्नंतर शासनाने दिनांक ५/१/२००७ रोजीच्या ज्ञापनान्वये सन २००६ च्या शिघ्रसिद्धगणकानुसार कब्जेहक्काची किंमत आकारुन उक्त जमीन मंजूर करण्याबाबत अंतिम आदेश देण्यात आले आहे. तसेच, सन २००६ च्या शिघ्रसिद्धगणकानुसार कब्जेहक्काची किंमत निश्चित करून, सदर रक्कम तसेच पश्चिम रेल्वे कडून यापूर्वी वसूल केलेली रक्कम यामधील फरकाची रक्कम प्रचलित व्याजाने वसूल करण्याबाबत उक्त ज्ञापनान्वये अट विहित करण्यात आली होती. यासंदर्भात सह. जिल्हा निबंधक, वर्ग-१, ठाणे ग्रामिण यांना सन २००६ च्या शिघ्रसिद्धगणकानुसार मौजे उमेळमान, ता. वसई येथील स. नं. १०१ अ मधील क्षेत्र १५८१२.३५ चौ.मी. क्षेत्राचे मुल्यांकन रु. १,०२,२५,२२५ इतके असल्याचे जिल्हाधिकारी यांना कळविले होते. प्रस्तुत प्रकरणी पश्चिम रेल्वेकडून यापूर्वी वसूल केलेली रक्कम ही सह. जिल्हा निबंधक, वर्ग-१ ठाणे ग्रामीण यांनी कळविलेल्या मुल्यांकनापेक्षा जास्त असल्याने पश्चिम रेल्वे कडून वसुली फरकाची अथवा व्याजाची वसुली करण्यात आलेली नाही. तसेच पश्चिम रेल्वे कडून प्रश्नाधीन जमिनीसाठी निश्चित करण्यात आलेले मुल्यांकन विभागाकडून निश्चित करण्यात आलेले आहे.

१.८ परिच्छेद क्र. ४.२.३.२ कृषीतर दराऐवजी दर लावल्यामुळे भोगवटामुल्याची कमी आकारणी :

मे, २००६ मध्ये निर्धारित केलेल्या शासन ठरावानुसार, भोगवटा तत्त्वावर किंवा भाडेपट्टा तत्त्वावर शासकीय जमिनीचे वाटप करण्याकरिता आणि जेथे शासकीय जमिनीचे मुल्यांकन करावयाचे आहे अशा सर्व प्रकरणांमध्ये, मुल्यांकन, ASR मध्ये ज्या तारखेला शासकीय जमिनीच्या वाटपाचे आदेश दिले गेले त्या तारखेला विहीत केलेल्या दरांप्रमाणे किंवा मुल्यांकन करण्याकरिता झालेल्या इतर आदेशाप्रमाणे ठरविले जाईल. ASR च्या अनुदेशानुसर जर ग्रामीण क्षेत्रात असलेली शासकीय जमीन कृषितर कारणाकरिता वाटप केली गेली, तिचे बाजार ASR मध्ये त्या प्रातांकरिता विहित केलेल्या कृषितर दराच्या ५० टक्के दराप्रमाणे ठरविले जाईल.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जमीन वाटपाच्या प्रकरणांच्या चाचणी तपासणीत आम्हाला जानेवारी, २००७ आणि जून, २०१० या दरम्यान असे आढळून आले की, ७७ प्रकरणांपैकी ११ प्रकरणांत शासकीय जमिनीचे वाटप कृषीतर हेतूकरिता जसे शाळा, महाविद्यालये नवीनीकरण करण्याजोगे ऊर्जा प्रकल्प, वीज प्रकल्प, साखर कारखाने व इतर वाणिज्यिक हेतूकरिता केले गेले आणि आकारणी केले गेलेले एकूण भोगवटा मूल्य

रु. ७.६५ कोटी होते जे कृषीतर दराऐवजी, दरांच्या वार्षिक विवरणपत्रात विहित केलेल्या कृषीदराप्रमाणे होते. कृषीदर लावून भोगवटा मूल्य रु. ३९.७६ कोटी इतके निघते. याप्रकारे अनुदेशांचे पालन न करण्याचा परिणाम रु. ३२.११ कोटी एवढ्या भोगवटा मुल्याच्या कमी आकारणीत झाला.

आम्ही हे निदर्शनास आणून दिल्यानंतर तीन जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की, ही बाब पडताळली जाईल आणि दोन जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की, भोगवटा मुल्य बरोबर वसूल केले गेले. हे उत्तर बरोबर नाही कारण उप निबंधकांनी कळविलेले दर वार्षिक विवरणपत्रातील दरापेक्षा कमी होते आणि भोगवटा मुल्याची आकारणी दरांच्या वार्षिक विवरणपत्रात नमूद केलेल्या दरांप्रमाणे करावयास हवी होती व उप निबंधकानी कळविलेले दर पुन्हा दरांच्या वार्षिक विवरणपत्राशी तपासून पहावयास हवे होते.

आम्ही ही बाब शासनाला ऑगस्ट, २०१२ मध्ये कळविली. शासनाने नमूद केले (ऑक्टोबर, २०१२) की, नाशिक जिल्ह्यातील दोन प्रकरणांत वसुली सूचना निर्गमित केली गेली आहे. इतर प्रकरणात त्याचे उत्तर प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१३).

१.९ ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.–

उक्त परिच्छेदामध्ये पुणे जिल्ह्यातील खालील ४ प्रकरणांचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

Annexure-A

गावाचे नाव (१)	संस्थेचे नाव (२)	परिच्छेदाचा तपशील (३)	
मौजे नेरे, ता. मुळशी, जि. पुणे	सोमेश्वर फाऊंडेशन	short levy of Occupancy Price/lease sent (A) & Inerest leviable (B).	रु. ४८,२०,००० रु. १५,२४,३२५

महसूल व वन विभागाच्या दिनांक २५/०९/२००८ रोजीच्या ज्ञापनान्वये दिलेल्या अटी व शर्तीनुसार कब्जेहक्काची रक्कम रु. २८,८०,००० इतकी जमा करून सोमेश्वर फाऊंडेशन, पुणे यांना मौजे नेरे, ता. मुळशी, जि. पुणे येथील ग.नं. ११७ मध्ये ६ एकर जमीन शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आली आहे. उक्त प्रकरणी उपस्थित परिच्छेदामधील नमुद रक्कम रु. ४८,२०,००० आणि या रक्कमेवरील व्याज रु. १५,२४,३२५ इतकी शासन जमा करणेबाबत प्रतिग्रहिता यांना जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून दिनांक, २०/९/२०१६ दिनांक १५/०९/२०१७ व दिनांक ३०/१०/२०१७ अन्वये नोटीस देणेत आलेली आहे. तसेच प्रकरणी सदर संस्थेने प्रदान जागेचा वापर दिलेल्या प्रयोजनासाठी अद्याप सुरू केलेला नसल्याने सदरची मिळकत जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दिनांक १०/११/२०१७ रोजीच्या आदेशान्वये शासनजमा करण्यात आली आहे.

Annexure-B

गावाचे नाव (१)	संस्थेचे नाव (२)	परिच्छेदाचा तपशील (३)	
मौजे तुळापूर, ता. हवेली, जि. पुणे.	पुणे महानगरपालिका	short levy of Occupancy Price/lease sent (A) & Interest leviable (B)	रु. १३,४५,१५,७४४ रु. ३,३३,२०,६७१

महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील ज्ञापन क्र. जमीन-३४०९/१९९/प्र.क्र. ११८१/ज-५, दिनांक २६/४/२०१० अन्वये मौजे तुळापूर, ता. हवेली, जि. पुणे येथील ग.नं. ६४ पै.क्षेत्र २५ हेक्टर इतकी जमीन पुणे महानगरपालिका यांना रिन्युएबल एनर्जी जनरेशन प्रकल्प करीता मंजूर करणेत आलेली होती.

त्यानुसार जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाच्या दिनांक ८/६/२०१० रोजीच्या आदेशान्वये कब्जेहक्काची रक्कम रुपये १,३१,६२,२५६ (एक कोटी एकतीस लाख बासष्ट हजार दोनशे छप्पन रुपये फक्त) जमा करून घेऊन सदरची जमीन पुणे महानगरपालिकेस प्रदान करणेत आलेली आहे.

तथापि, तुळापुर नजीक घनकचऱ्यापासून बनावयाचा रिन्युएबल एनर्जी जनरेशन प्रकल्प उभारण्यास स्थानिक ग्रामस्थांचा विरोध आहे. त्यामुळे सदरच्या जमिनीवर अद्याप वरील प्रकल्प उभा राहिलेला नाही.

पुणे महानगरपालिकेस घनकचऱ्यापासून बनावयाचा रिन्युएबल एनर्जी जनरेशन प्रकल्प उभारणे आवश्यक असल्याने व पुणे महानगरपालिकने केलेल्या विनंतीस अनुसरुन वन विभाग मौजे पिंपरी सांडस येथील जमीन देण्यास तयार असल्याने व त्या बदल्यात मौजे तुळापूर येथील पुणे मनपास प्रदान केलेल्या एकूण २५ हे. जमिनीपैकी १९.९० हे. आर क्षेत्र स्विकारण्यास तयार असल्याने व त्यास केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाने तत्त्वतः मान्यता दिली असल्याने शासनाने मौजे तुळापूर येथील १९.९० हे.आर ताबा पुणे मनपाकडून काढून घेतला आहे व सदरचे क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात दिले आहे. यासंदर्भातील नोंदी गा.न.नं.७/१२ वर घेण्यात आले आहेत. तसेच मौजे पिंपरी सांडस येथील वन विभागाच्या ताब्यातील १९.९० हे.आर. जमीन पुणे महानगरपालिकेकडे वर्ग करण्याची कार्यवाही वन विभागामार्फत सुरू आहे. यासंदर्भातील वन अधिनियमातील तरतुदीनुसार मुल्यांकित होणारी रक्कम ही वन विभाग पुणे मनपाकडून वसूल करणार आहे.

सबब, पुणे मनपाच्या घनकचरा प्रकल्पाकरिता पर्यायी जमीन म्हणून मौजे तुळापूर येथील एकूण २५ हे.पैकी १९.९० हे.आर.जमीन वन विभागाकडे वर्ग केली असल्याने सदर क्षेत्र वगळता उर्वरीत ५.१० हे.आर.क्षेत्राच्या कब्जेहक्काची रक्कम मुल्यांकित करून पुणे मनपाकडून यापूर्वी शासनजमा करण्यात आलेली रक्कम वजा करून उर्वरीत वसूलपात्र रक्कम पुणे मनपाकडून वसूल करण्यात येईल.

तरी सदरच्या परिच्छेदातील Annexure-B मधील १ संदर्भातील अनुपालन मान्य होणेस विनंती आहे.

Annexure-B (२)

गावाचे नाव (१)	संस्थेचे नाव (२)	परिच्छेदाचा तपशील (३)	
मौजे वढु खुर्द, ता. हवेली, जि. पुणे	पुणे महानगरपालिका	short levy of Occupancy Price/lease sent (A) & Inerest leviable (B).	रु. १३,४५,१५,७४४ रु. ३,३३,२०,६७१

महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील ज्ञापन क्र. जमीन, ३४०९/१९८/प्र.क्र. ११८२/ज-५, दिनांक २६/४/२०१० अन्वये मौजे वढु खुर्द, ता. हवेली, जि. पुणे येथील ग.नं.१४५ पै.क्षेत्र २५ हेक्टर इतकी जमीन पुणे महानगरपालिका यांना रिम्युएबल एनर्जी जनरेशन प्रकल्पाकरिता मंजूर करणेत आलेली होती.

त्यानुसार जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाच्या दिनांक ८/६/२०१० रोजीच्या आदेशान्वये कब्जेहक्काची रक्कम रुपये १,३१,६२,२५६ (एक कोटी एकतीस लाख बासष्ट हजार दोनशे छपन्न रुपये फक्त) जमा करून घेऊन सदरची जमीन पुणे महानगरपालिकेस प्रदान करणेत आलेली आहे.

तथापि, सदर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास वढु ग्रामस्थांनी तीव्र विरोध केल्याने सदर जमिनीचा पुणे महानगरपालिकेस अद्यापही प्रत्यक्ष ताबा देण्यात आलेला नाही. तरी सदरची जागा पुणे मनपास आवश्यक आहे किंवा कसे, याबाबत शहानिशा करून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तरी सदरच्या परिच्छेदातील Annexure-B मधील २ संदर्भातील अनुपालन मान्य होणेस विनंती आहे.

Annexure-C

गावाचे नाव (१)	संस्थेचे नाव (२)	परिच्छेदाचा तपशील (३)	
मौजे आलेगांव, कदमवस्ती, ता. दौंड, जि. पुणे.	दौंड शुगर प्रा. लि. (साखर कारखाना).	short levy of Occupancy Price/lease sent (A) & Inerest leviable (B).	रु. १,५०,९०,५०० रु. ७०,१७,०८३

मा. महालेखापाल, नागपूर यांनी सन २०१२-१३ केलेल्या तपासणी दरम्यान दौंड शुगर प्रा. लि.यांचेकडुन ग.नं.९९ मधील ५६ हेक्टर ७० आर जमिनीची कब्जेहक्काची रक्कम वसूल करताना बिनशेती दराप्रमाणे रक्कम न आकारल्याने कब्जेहक्काची किंमत कमी आकारली असा शक उपस्थित केला होता. त्यानुसार उक्त ५६७००० चौ.मी. क्षेत्रासाठी रेडीरेकनरच्या बिनशेती दराच्या ५०% दराने रक्कम रुपये १३० प्रती, चौ.मी. इतक्या दराने (दिनांक २९/४/२००८ च्या शासन निर्णयानुसार) कब्जेहक्काची रक्कम रुपये १,५०,९०,५०० चलनाने शासकीय कोषागारमध्ये भरलेले आहेत. तसेच मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ नुसार मुद्रांक शुल्क फी जमा करून घेऊन नोंदणीकृत करारनामा दस्त निष्पादित करण्यात आलेला आहे. परंतु सदर रक्कमेवरील व्याज रक्कम रुपये ७०,१७,०८३ अद्याप भरलेले नसल्याने संबंधितास दिनांक २/२/२०१७ रोजी नोटीस दिलेली आहे. उक्त प्रकरणी वसुलीची कार्यवाही चालू असून, परिच्छेदामधील नमूद वसुलपात्र रक्कम वसूल करण्याची दक्षता घेत आहोत.

तरी सदरच्या परिच्छेद संदर्भात अनुपालन मान्य होणेस विनंती आहे.

१.१० परिच्छेद क्र. ४.२.३.२ कृषीतर दराऐवजी दर लावल्यामुळे भोगवटा मुल्याची कमी आकारणी :

मे २००६ मध्ये निर्गमित केलेल्या शासन ठरावानुसार भोगवटा तत्त्वावर किंवा भाडेपट्टा तत्त्वावर शासकीय जमिनीचे वाटप करण्याकरीता, आणि जेथे शासकीय जमिनींचे मुल्यांकन करावयाचे आहे अशा सर्व प्रकरणांमध्ये, मुल्यांकन ASR मध्ये ज्या तारखेला शासकीय जमिनीच्या वाटपाचे आदेश दिले गेले त्या तारखेला विहित केलेल्या दरांप्रमाणे किंवा मुल्यांकन करण्याकरिता झालेल्या इतर आदेशाप्रमाणे ठरविले जाईल. ASR च्या अनुदेशानुसार जर ग्रामीण क्षेत्रात असलेली शासकीय जमीन, कृषीतर कारणाकरिता वाटप केली गेली, तिचे बाजार ASR मध्ये त्या प्रांताकरीता विहित केलेल्या कृषीतर दराच्या ५० टक्के दराप्रमाणे ठरविले जाईल.

पाच जिल्हाधिकारी कार्यालयातील जमीन वाटपाच्या प्रकरणाच्या चाचणी तपासणीत आम्हाला जानेवारी, २००७ आणि जुन, २०१० या दरम्यान असे आढळुन आले की, ७७ प्रकरणांपैकी ११ प्रकरणांत शासकीय जमिनींचे वाटप कृषीतर हेतुकरिता जसे, शाळा, महाविद्यालय, नवीनीकरण करण्याजोगे ऊर्जा प्रकल्प, वीज प्रकल्प, साखर कारखाने व इतर वाणिज्यिक हेतू करिता केले गेले आणि आकारणी केले गेलेले एकूण भोगवटा मुल्य रु. ७.६५ कोटी होते जे कृषीतर दरा ऐवजी दरांच्या वार्षिक विवरणपत्रात विहीत केलेल्या कृषीदराप्रमाणे होते. कृषीतर दर लावून भोगवटा मुल्य रु. ३९.७६ कोटी इतके निघते. याप्रकारे अनुदेशांचे पालन न करण्याचा परिणाम रु. ३२.११ कोटी एवढ्या भोगवटा मूल्याच्या कमी आकारणीत झाला.

आम्ही हे निदर्शनास आणून दिल्यानंतर तीन जिल्हाधिकाऱ्यांनी नमुद केले की, बाब पडताळली जाईल आणि दोन जिल्हाधिकाऱ्यांनी नमुद केले की, भोगवटा मूल्य आकारण्याआधी धारकांनी बाजार मूल्य उप निबंधकाकडून तपासून घेतले होते त्यामुळे भोगवटा मूल्य बरोबर वसुल केले गेले. उत्तर बरोबर नाही कारण, उप निबंधकांनी कळविलेले दर वार्षिक विवरणपत्रातील दरापेक्षा कमी होते आणि भोगवटा मूल्याची आकारणी दरांच्या वार्षिक विवरणपत्रास नमूद केलेल्या दरांप्रमाणे करावयास हवी होती व उपनिबंधकांनी कळविलेले दर पुन्हा दरांच्या वार्षिक विवरणपत्राशी तपासून पहावयास हवे होते.

आम्ही ही बाब शासनाला ऑगस्ट, २०१२ मध्ये कळविली. शासनाने नमुद केले (ऑक्टोबर, २०१२) की नाशिक जिल्ह्यांतील २ प्रकरणांत वसुली सूचना निर्गमित केली गेली आहे. इतर प्रकरणात त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे.(जानेवारी, २०१३)

१.११ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

सदर परिच्छेदामधील जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाशी संबंधित प्रकरणामधील अ.क्र. १० मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, नाशिक यांचेकडून मौजे आडगांव, ता. नाशिक येथील ग.नं.२१५९ चे क्षेत्र १ हे.६८ आर क्षेत्राची कब्जाहक्काच्या फरकाची व्याजासह रक्कम रुपये ३,९६,३९८ इतकी दिनांक २/९/२००८ रोजी शासकीय खजिन्यात भरणा करून घेतलेली आहे.

तसेच जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाशी संबंधित प्रकरणामधील अ.क्र. ११ मध्ये मौजे भेंडी,ता. कळवण येथील ग.नं. १३ पैकी १ हे ७५ आर क्षेत्र कांदा निर्यात सुविधा केंद्रासाठी वितरीत केलेल्या जागेची कब्जाहक्काच्या फरकाची रक्कम २५,०००, ६६,४६५, १,५०,०००, ३,००,०००, १,००,००० अशी एकूण ६,४१,४६५ इतकी रक्कम अनुक्रमे १२/१०/२०१२, २२/१२/२०१२, २६/३/२०१३, १०/२/२०१७ व २९/५/२०१७ अन्वये शासकीय खजिन्यात भरणा करून घेतलेली आहे.

वरीलप्रमाणे परिच्छेदात नमूद जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाशी संबंधित प्रकरणांमध्ये वसुलीची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. सबब सदरचा परिच्छेद क्र. ४.२.३.२ स्विकृत होणेस विनंती आहे.

१.१२ परिच्छेद क्र. परिच्छेद क्र. ४.२.३.२ " कृषीत्तर दराऐवजी कृषी दर लावल्यामुळे भोगवटा मूल्याची कमी आकारणी " :

जिल्हाधिकारी कार्यालयातील जमीन वाटपांच्या प्रकरणांच्या चाचणी तपासणीत आम्हास जानेवारी, २००७ आणि जून, २०१० या दरम्यान असे आढळून आले की, ७७ प्रकरणांपैकी ११ प्रकरणात शासकीय जमीनीचे वाटप कृषीतर हेतूकरिता जसे शाळा, महाविद्यालये नविनीकरण करण्याजोगे उर्जा प्रकल्प, वीज प्रकल्प, साखर कारखाने व इतर वाणिज्यिक हेतु करीता केले गेलेले आणि आकारणी केले गेलेले एकूण भोगवटा मूल्य रु. ७.६५ कोटी होते. जे कृषीतर दराऐवजी दरांच्या वार्षिक विवरणपत्रात विहित केलेल्या कृषीदराप्रमाणे होते. कृषीतर दर लावून भोगवटा मूल्य रु. ३९.११ कोटी एवढ्या भोगवटा मूल्याच्या कमी आकारणीत झाल्या.

आम्ही हे निदर्शनास आणून दिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी नमुद केले की, ही बाब पडताळणी जाईल आणि जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की, भोगवटा मूल्य आकरण्याआधी धारकांनी बाजार मूल्य उप निबंधकांकडून तपासून घेतले होते. त्यामुळे भोगवटा मूल्य बरोबर वसूल केले गेले. हे

उत्तर बरोबर नाही कारण उप निबंधकांनी कळविलेले दर वार्षिक विवरणपत्रात नमूद केलेल्या दरांप्रमाणे करावयास हवी होती व उप निबंधकांनी कळविलेले दर पुन्हा दरांच्या वार्षिक विवरणपत्रांशी तपासून पहावयास हवे होते.

आम्ही ही बाब शासनाला ऑगस्ट, २०१२ मध्ये कळविली, शासनाने नमूद केले (ऑक्टोबर, २०१२) की नाशिक जिल्ह्यातील दोन प्रकरणांत वसूली सूचना निर्गमित केली गेली आहे. इतर प्रकरणात त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे.

१.१३ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

जालना जिल्ह्यातील मौ.बेलगाव, ता. अंबड येथील गट क्र. २ मधील शासकीय जमीन ३३ केव्ही उपकेंद्र उभारण्यासाठी महावितरण या कंपनीस शासन ज्ञापन क्र. ३९अ/२०००/प्र.क्र. १०१/ज-७, दिनांक १७ मार्च, २००७ अन्वये रु. १,१८,००० इतके मुल्यांकन आकारुन जमीन वाटप करण्यात आली.

सदर प्रकरणात ऑडीट ऑफिसर मा. महालेखापाल (ऑडीट) २ महाराष्ट्र यांचे कार्यालय यांनी लेखापरिक्षणामध्ये आक्षेप कळविल्यानुसार व जमीनीचा संभाव्य अकृषीक वापर विचारात घेवून त्यानुसार मुल्यांकनाच्या फरकाची होणारी रक्कम रु. ५,३३,००० भरणा करण्याबाबत महावितरण कंपनीस दिनांक ४/९/२०१२ व दिनांक १३/९/२०१२ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या होत्या.

त्यानुसार मौ.बेलगाव, ता. अंबड, जि. जालना येथील म.रा.वि.वितरण कंपनीस देण्यात आलेल्या जमिनीचे मुल्यांकनाच्या फरकाची रक्कम रुपये ५,३३,००० चलन क्र. ८ दिनांक २३.१०.२०१२ अन्वये कोषागारास भरणा करून घेण्यात आली आहे. याप्रकरणी कार्यवाही करण्यात आली असल्यामुळे सदर प्रारुप परिच्छेद वगळण्यात यावा, अशी विनंती करण्यात येत आहे.

१.१४ परिच्छेद क्र. ४.२.३.२ कृषीतर दराऐवजी कृषी दर लावल्यामुळे भोगवटामूल्याची कमी आकारणी :

पाच जिल्हाधिकारी कार्यालयातील जमीन वाटपांच्या प्रकरणांच्या चाचणी तपासणीत मे २००६ मध्ये निर्धारित केलेल्या शासन ठरावानुसार, भोगवटा तत्त्वावर किंवा भाडेपट्टा तत्त्वावर शासकीय जमिनीचे वटप करण्याकरीता आणि जेथे शासकीय जमिनीचे मुल्यांकन करावयाचे आहे अशा सर्व प्रकरणांमध्ये, मुल्यांकन, ASR मध्ये ज्या तारखेला शासकीय जमिनीच्या वाटपाचे आदेश दिले गेले त्या तारखेला विहीत केलेल्या दरांप्रमाणे किंवा मुल्यांकन करण्याकरीता झालेल्या इतर आदेशाप्रमाणे ठरविले जाईल. ASR च्या अनुदेशानुसर जर ग्रामीण क्षेत्रात असलेली शासकीय जमीन कृषितर कारणाकरीता वाटप केली गेली, तिचे बाजार ASR मध्ये त्या प्रातांकरीता विहित केलेल्या कृषितर दराच्या ५० टक्के दराप्रमाणे ठरविले जाईल.

आम्हाला जानेवारी, २००७ आणि जून, २०१० या दरम्यान असे आढळून आले की, ७७ प्रकरणांपैकी ११ प्रकरणांत शासकीय जमिनीचे वाटप कृषीतर हेतूकरिता जसे, शाळा, महाविद्यालये, नवीनीकरण करण्याजोगे ऊर्जा प्रकल्प, वीज प्रकल्प, साखर कारखाने व इतर वाणिज्यिक हेतूकरिता केले गेले आणि आकारणी केले गेलेले एकूण भोगवटा मूल्य रु. ७.६५ कोटी होते जे कृषीतर दराऐवजी, दरांच्या वार्षिक विवरणपत्रात विहित केलेल्या कृषिदराप्रमाणे होते. कृषीतर दर लावून भोगवटा मूल्य रु. ३९.७६ कोटी इतके निघते. याप्रकारे, अनुदेशांचे पालन न करण्याचा परिणाम रु. ३२.११ कोटी एवढया भोगवटा मूल्याच्या कमी आकारणीत झाला.

आम्ही हे निदर्शनास आणून दिल्यानंतर तीन जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की ही बाब पडताळली जाईल आणि दोन जिल्हाधिकाऱ्यांना नमूद केले की, भोगवटा मूल्य आकारण्याआधी धारकानी बाजार मूल्य उप निबंधकांकडून तपासून घेतले होते. त्यामळे भोगवटा मूल्य बरोबर वसूल केले गेले. हे उत्तर बरोबर नाही कारण उप निबंधकांनी कळविलेले दर वार्षिक विवरणपत्रातील दरापेक्षा कमी होते आणि भोगवटा मूल्याची आकारणी दराच्या वार्षिक विवरणपत्रात नमूद केलेल्या दरांप्रमाणे करावयास हवी होती व उपनिबंधकांनी कळविलेले दर पुन्हा दरांच्या वार्षिक विवरणपत्राशी तपासून पहावयास हवे होते.

आम्ही ही बाब शासनाला ऑगस्ट, २०१२ मध्ये कळविली. शासनाने नमूद केले (ऑक्टोबर, २०१२) की, नाशिक जिल्ह्यातील दोन प्रकरणांत वसूली सूचना निर्गमित केली गेली आहे. इतर प्रकरणात त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे. (जानेवारी, २०१३).

१.१५ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

सदर परिच्छेद क्र. ४.२.३.२ बाबत नागपूर जिल्ह्यातील ३ प्रकरणांसंदर्भात खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

(१) मौजा घुटी, नागपूर (ग्रामीण), येथील स. नं. २६ खाते क्र. १०० पैकी १०.०० हे.आर.जमीन अभियांत्रिकी महाविद्यालय व इतर शैक्षणिक प्रयोजनासाठी सेमाना विद्या व वन विकास प्रशिक्षण मंडळास शासन ज्ञापन क्र. जमीन-४९०७/प्र.क्र. २४४/ज-८, दिनांक ९/१/२००८ तसेच पुरकपत्र दिनांक १४/३/२००८ अन्वये मंजूर करण्यात आलेली होती. सदर पुरकपत्रात शासन निर्णय दिनांक ३०/६/१९९२ मधील तरतुदीनुसार जमीन मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्व ५ वर्ष आधीच्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या बाजारमूल्याच्या २५% रक्कम आकारुन जमीन मंजूर करण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले होत.

सदर ज्ञापन व पूरकपत्रास अनुसरुन दुय्यम निबंधक नागपूर (ग्रामीण) यांनी सन २००३ रोजी या वर्षाचे शीघ्रसिद्धगणक पद्धतीनुसार अस्तित्वात असलेले प्रश्नाधिन जनिमीचा मूल्यांकन दर प्रति हेक्टरी रुपये ५१,००० असे कळविल्यानुसार, मंजूर जमिनीची एकूण किंमत रुपये ५,१०,००० व त्याचे २५% रक्कम रुपये १,२७,५०० निश्चित करून जमीन मंजुरीचे जिल्हाधिकारी, नागपूर यांनी आदेश क्र. राजस्व/ब-१/कावि-३७४/२००८,दिनांक २६/३/२००८ निर्गमित केले आहेत. अर्जदार संस्थेकडून निश्चित केलेली रक्कम रुपये १,२७,५०० दिनांक २७/३/२००८ रोजी चलनाद्वारे शासन खजिना दाखल केलेली आहे. उपरोक्त शासन ज्ञापन क्र. जमीन-१९०७/ प्र.क्र. २४४/ज-८, दिनांक ९/१/२००८ तसेच पुरकपत्र दिनांक १४/३/२००८ नुसार सदर रक्कम जमा करण्यात आली आहे.

(२) मौजा खेरी (खुर्द), ता. हिंगणा, जि. नागपूर येथील प.ह.नं. ५० अ, स. नं. १९ मधील ४१.१८ हे.आर., स. नं. ५४ मधील २०.४० हे.आर.व.स. नं. ८५ मधील ५७.४४ हे.आर.(६०.१६-२.७२ = ५७.४४ हे.आर.) अशी एकूण १२१,०१ हे.आर.जमीन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, नागपूर यांनी ऊर्जा प्रकल्पाकरिता शासन ज्ञापन क्र. जमीन-४९०८/७५७/प्र.क्र. १/ज-८, दिनांक ५/६/२०१० अन्वये विना लिलाव, परंतु, सन २०१०-११ या वर्षाच्या बाजारमुल्य दर तक्त्यानुसार होणारी प्रश्नाधीन जमिनीची अकृषिक प्रयोजनासाठीची कब्जेहक्काची किंमत आकारुन मंजूर करण्यात आली होती.

सदर ज्ञापनास अनुसरुन, प्रश्नाधीन जमिनीचे सन २०१० बाजारमुल्य दर तक्त्यात अकृषक दर रुपये ३०० प्रति चौ.मी. होते. मुख्य अभियंता, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि., नागपूर यांनी पत्र दिनांक १२/८/२०११ अन्वये शासन ज्ञापनामध्ये मंजूर करण्यात आलेल्या जमिनीपैकी स. नं. १९, मधील आराजी ९,१३४६ हे.आर.जागेचा ताबा प्रथम देण्याबाबत विनंती केली. त्यानुसार ९,१३४६ हे.आर या जमिनीचे मुल्य रुपये २,७४,०३,८०० दिनांक ११/८/२०११ च्या धनादेशाद्वारे शासन जमा केलेले आहे. उक्त रक्कम शासन खजिना दाखल झाल्यावर जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयाचे आदेश क्र. राजस्व/ब-१/जमीन/कावि-१९९१/२०११, दिनांक १८/०८/२०११ अन्वये जमीन मंजुरीचे आदेश निर्गमित करण्यात आले. उपरोक्त शासन ज्ञापन क्र. जमीन-१९०८/७५७/प्र.क्र. १/ज-८, दिनांक ५/६/२०१०अन्वये सदर रक्कम जमा करण्यात आली आहे.

(३) मौजा खैरी (खुर्द), ता. हिंगणा, जि. नागपूर येथील प.ह.नं. ५०अ, स. नं. ८५, आराजी ६०.१६ हे.आर पैकी २.७२ हे.आर जमीन केंद्र शासनाच्या केंद्रीय रिझर्व्ह पोलीस बल,नागपूर यांना फायरिंग रेंजकरिता शासन ज्ञापन क्र. जमीन ४९०४/प्र.क्र. ४४/ज-८, दिनांक १८/९/२००८ अन्वये प्रचलित बाजारमुल्यदर तक्त्यानुसार विचाराधीन जमिनीची अकृषिक प्रयोजनासाठी येणारी किंमत आकारुन मंजूर करण्यात आली होती.

प्रचलित बाजारमूल्य दर तक्त्यानुसार उक्त जमिनीचे मुल्यांकन रुपये १०.८८,००० आकारुन जिल्हाधिकारी, नागपूर यांनी आदेश क्र. राजस्व/ब-१/जमीन/कावि-४०/२००९, दिनांक २२/०१/२००९ आदेश निर्गमित केले. अर्जदार विभागाकडून निश्चित केलेली रक्कम रुपये १०,८८,००० दिनांक ६/१/२०१० रोजी चलनाद्वारे शासन खजिना दाखल केलेली आहे. परंतु, उक्त जमिनीचे मुल्यांकन हे कृषिक जमिनीचे असल्याचे निदर्शनास आल्याने, सह दुय्यम निबंधक वर्ग-२, हिंगणा यांनी दिनांक १७.१२.२०१२ च्या पत्रान्वये उक्त जमिनीचे अकृषिक मुल्यांकन रुपये ४६,९५,००० कळविलेले होते. परंतु अंकगणितीय चुकीमुळे सदर मुल्यांकनाच्या ६०% म्हणजे रुपये २८,१७,००० कब्जेहक्काची किंमत निश्चित करण्यात येवून यामधून पूर्वी शासनजमा केलेली रक्कम वजा जाता उर्वरित रुपये १७,२९,००० व सन २०१० ते सन २०१२ पावेतो व्याजाची रक्कम रुपये ६,७४,३१० अशी एकूण रक्कम रुपये २४,०३,३१० शासन जमा करण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयाचे आदेश क्र. राजस्व/ब-१/कावि-१२८६/२०१२, दिनांक ३०/१०/२०१२ अन्वये सुधारित आदेश निर्गमित केले होते. सदर चूक लक्षात येताच, दिनांक २/१२/२०१६ च्या पत्रान्वये सह दुय्यम निबंधक

वर्ग-२, हिंगणा यांच्याकडून मुल्यांकन मागविले असता, सह दुय्यम निबंधक वर्ग-२,हिंगणा यांनी दिनांक ३/१/२०१६ च्या पत्रान्वये सदर जमिनीचे सन २००९ चे अकृषक मुल्यांकन रु. ४९,२०,००० इतके होते. दिनांक १७.१०.२०१२ व दिनांक ३.१२.२०१६ च्या मुल्यांकनात तफावत दिसून आल्यामुळे, सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर (ग्रामीण) यांच्याकडून मूल्यांकन मागविले असता, त्यांनी दिनांक २.११.२०१७ च्या पत्रान्वये अकृषक मुल्यांकन रु. ५५,५६,००० इतके कळविले. त्यानुसार, कब्जेहक्काची जमा केलेली रक्कम वगळून उर्वरित रक्कम रु. ४४,६८,००० व व्याजाची रक्कम रु. ४०,५६,९९४ जमा करण्याच्या अटीवर उक्त जमीन मंजूर करण्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयाने क्र. राजस्व/ब-१/कावि-१५९९/२०१७, दिनांक ३.११.२०१७ रोजी सुधारित आदेश निर्गमित केले आहेत.

विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने महालेखाकारांनी खालील अभिप्राय नोंदविले.

Collector Jalana recovered Rs.5.33 lakh out of short levied amount of Rs.5.96 lakh in October 2012. Recovery details of balance amount of Rs. 63,000 may be stated.

Reply from Collector Nagpur is not acceptable. In resepect of land allotted to Semana Vidhya and Van Vikas Training Institute.

Application of per hectare rate applicable to agriculture is not correct as the land was allotted for non-agriculture pupose. In parea 4.2.3.1 related to allotment of land for education purpose in Collector Ahmedunagar, Government accepted that the occupancy price should have been levied considering the rate applicable for non-agriculture purpose. Further, audit had worked out the value by applying the slab prescribed in GR dated 29/4/2008.

In respect of land alloted to Maharashtra Airport Development Company, the rate applicable as per ASR of 2010 was 17000 per sqm and audit considered Rs 850 as per the instruction ३१ of ASR.

Audit has not comments to offer in repsept of land alloted to CRPF.

१.१६ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

मा. महालेखापाल नागपूर यांचे अभिप्रायाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

(१) मौजा घुटी, नागपूर (ग्रामीण), येथील स. नं. २६ खाते क्र. १०० पैकी १०.०० हे.आर.जमीन अभियांत्रिकी महाविद्यालय व इतर शैक्षाणिक प्रयोजनासाठी सेमाना विद्या व वन विकास प्रशिक्षण मंडळास शासन ज्ञापन क्र. जमीन-४९०७/प्र.क्र. २४४/ज-८, दिनांक ९/१/२००८ तसेच पुरकपत्र दिनांक १४/३/२००८ अन्वये मंजूर करण्यात आलेली होती. सदर पुरकपत्रात शासन निर्णय दिनांक ३०/६/१९९२ मधील तरतुदीनुसार जमीन मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्व ५ वर्ष आधीच्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्त्वित्वात असलेल्या बाजारमूल्याच्या २५% रक्कम आकारुन जमीन मंजूर करण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले होते.

शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी देताना अकृषक दर घेण्याबाबतचा शासन निर्णय क्रमांक जमीन-१९/२००७/प्र.क्र. २८/ज-१, दिनांक २९.४.२००८ हा दिनांक १४.३.२००८ च्या मंजुरी आदेशानंतर पारित करण्यात आलेला असल्यामुळे सदर प्रकरणांत कृषक दर घेण्यात आलेला आहे व त्यानुसार आदेश पारित करून सदर रक्कम खजिना दाखल करण्यात आलेली आहे.

(२) मौजा खैरी (खुर्द), ता. हिंगणा, जि. नागपूर येथील प.ह.नं. ५० अ, स. नं. १९ मधील ४१.१८ हे.आर.स. नं. ५४ मधील २०.४० हे.आर. व स. नं. ८५ मधील ५७.४४ हे.आर. (६०.१६-२.७२ = ५७.४४ हे.आर.)अशी एकूण १२१.०२ हे.आर. जमीन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि.,नागपूर यांना ऊर्जा प्रकल्पाकरिता शासन ज्ञापन क्र. जमीन-१९०८/७५७/प्र.क्र. १/ज-८,दिनांक ५/६/२०१० अन्वये विना लिलाव, परंतु सन २०१०-११ या वर्षाच्या बाजारमुल्य दर तक्त्यानुसार होणारी प्रश्नाधीन जमिनीची अकृषिक प्रयोजनासाठीची कब्जेहक्काची किंमत आकारुन मंजूर करण्यात आली होती.

सन २०१० चे सदर जागेचे प्रति चौ.मी. दर रुपये १७०० इतका आहे. ग्रामीण क्षेत्रातील विकसनक्षम विभागात समाविष्ट असलेल्या क्षेत्राकरिता संभाव्य बिनशेती वापरासाठी दर दिला असल्यास तो विचारात घ्यावा. नसल्यास बिनशेती दराच्या ५०% मूल्य दर विचारात घ्यावयाचा

असल्यामुळे, प्रति चौ.मी. दर रुपये ८५० असून त्यानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि., नागपूर यांना देण्यात आलेल्या एकूण ९,१३४६ हे.आर. जमिनीचे रुपये ४,८४,५६,४६० आवेदक विभागाकडून घेणे अपेक्षित होते. उक्त जमिनीच्या रु. २,७४,०३,००० एवढी रक्कम शासन खजिना दाखल करण्यात आलेली असून उर्वरित रु. २,१०,५३,४६० महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि., नागपूर यांचेकडून वसूल करण्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांनी अहवाल दिला आहे.

१.१७ परिच्छेद क्र. ४.२.३.३ " चुकीचे बाजारमूल्य लावल्यामुळे भोगवटा मूल्याची चुकीची आकारणी " :

जिल्हाधिकारी कार्यालय अकोला येथील जमीन वाटपाच्या प्रकरणांच्या चाचणी तपासणीत असे उघडकीस आले की, एका प्रकरणात महसूल व वन विभागाने, कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे महामंडळ यांना कृषी हेतूसाठी " सुकळी संग्राहक लघु पाटबंधारे योजना " या योजनेसाठी भोगवटा तत्वावर जमीनीचे वाटप केले होत (ऑगस्ट, २००९) वाटपाच्या आदेशानुसार भोगवटा मुल्याची वसुली २००८ वर्षाच्या दराच्या वार्षिक विवरणपत्रात विहित केलेल्या प्रचलित बाजार मुल्याप्रमाणे जे २००९ या वर्षासाठी केलेल्या प्रचलित बाजार मुल्याप्रमाणे जे २००९ या वर्षासाठी लागू होते. करावयाची होती. त्यानुसार उप निबंधकाने कळविलेल्या बाजार मुल्याच्या आधारावर रुपये ३३.८३ लाख इतक्या भोगवटा मुल्याची आकारणी केली गेली. तथापि, आम्हाला असे दिसून आले की, हे बाजार मुल्य २००९ या वाटपाच्या वर्षाच्या दराऐवजी २००७ या वर्षाचा दर लावून काढले होते. २००९ या वर्षाच्या वार्षिक विवरणपत्रातील कृषी दराचा अंगिकार करून अचुक भोगवटा मुल्य रुपये ३९.८० लाख एवढे येते. याचा परिणाम भोगवटा मुल्याच्या रुपये ५.९७ लाख इतक्या कमी आकारणीत झाला.

आम्ही हे निदर्शनात आणल्या नंतर जिल्हाधिकारी यांनी नमूद केले (जून २०१२) की, ही बाब पडताळली जाईल व आवश्यकता असल्यास वसुल केली जाईल. पुढील कार्यवाही केल्याचा अहवाल प्राप्त झाला नाही. (जानेवारी, २०१३)

१.१८ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

शासन आदेश, महसूल व वन विभाग, क्र. जमीन ४५०८/५५८/प्र.क्र. १४३/ज-८, दिनांक ३१/८/२००९ अन्वये शासनाने अकोला जिल्ह्यातील सुकळी संग्राहक लघु पाटबंधारे योजनेकरीता लागणाऱ्या वनजमिनीच्या मोबदल्यात, वन विभागास पर्यायी वनीकरणासाठी जमीन उपलब्ध करून देण्याकरिता, मौजा जिराईत, ता. पातूर, जि. अकोला येथील सर्व्हे क्र. २२२ मधील " ई " वर्ग जमिनीपैकी १९.९० हे.आर.जमीन कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे महामंडळ, अकोला यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४० तसेच कलम ३१ मधील तरतुदीनुसार देण्यास मान्यता दिली आहे. सदर जमिनीची किंमत प्रचलित बाजारमूल्यानुसार कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे महामंडळ, अकोला यांच्याकडून वसूल करण्याचे अटीवर उक्त जमीन दिली आहे. कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे महामंडळ, अकोला यांनी सन २००८ च्या बाजार भाव मुल्यांकनानुसार रुपये ३३.८३ लाख भरणा केला आहे. सन २००९ च्या मुल्यांकनानुसार सदर जमिनीची किंमत रुपये ३९.८० लाख आहे. जिल्हाधिकारी, अकोला यांनी त्यांच्या दिनांक १७ जून, २०१२ च्या पत्रान्वये कळविले आहे की, जमिनीच्या किंमतीतील फरक रु. ५,९७,००० व त्यावरील सन २०१०-२०११ व २०१२ च्या व्याजापोटी रु. १,८१,४६४ असे एकूण रु. ७,७८,४६४ दिनांक १६/१०/२०१२ रोजी शासनास जमा केले आहेत.

१.१९ विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने महालेखाकारांनी खालील अभिप्राय नोंदविले.

Further progress made in recovering the amount from executive Engineer, Akola Irrigation Corporation may be intimated.

१.२० परिच्छेद क्र. ४.२.३.४ वाटपाचे अंतिम आदेश निर्गमित न केल्यामुळे भोगवटा मूल्याची वसुली न होणे :

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अभिलेखाच्या चाचणी तपासणीत आम्हाला असे आढळून आले की, महसूल व वन विभागाने त्यांच्या दिनांक १० मार्च, २०१० च्या ज्ञापनाद्वारे मौजे दिघी, पुणे येथे असलेल्या ८००० चौ.मी. जागेचे वाटप पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला जकात नाक्यासाठी प्रचलित बाजारमुल्याने भोगवटा तत्त्वावर केले होते. मंजुरी आदेशाच्या अटी व शर्तीप्रमाणे जिल्हाधिकारी यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून दराच्या वार्षिक विवरणपत्रात विहित केलेल्या प्रचलित बाजारमुल्याप्रमाणे भोगवटामुल्य वसुल करावयाचे होते. तथापि, जिल्हाधिकारी यांनी ना वाटप आदेश निर्गमित केले ना भोगवटा मुल्याची वसुली केली.

तलाठी, दिघी यांनी जिल्हाधिकारी यांना मार्च, २०११ मध्ये दिलेल्या अहवालाप्रमाणे ही जमीन आधीच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून जकात नाक्यासाठी वापरली जात होती. २०१० या वर्षाच्या दराच्या वार्षिक विवरणपत्राप्रमाणे बाजार मुल्यावर रु. १.४६ कोटी इतके भोगवटा मुल्य निघते. याप्रकारे वाटपाचे आदेश निर्गमित न करणे आणि भोगवटा मुल्य वसूल न करणे याचा परिणाम रु. १.४६ कोटी एवढ्या महसूलीची हानी

होण्यात झाला. आम्ही हे निदर्शनास आणल्यानंतर जिल्हाधिकारी, पुणे यांनी नमुद केले (जून २०१२) की, ही बाब पडताळली जाईल व योग्य कार्यवाही केली जाईल.

१.२१ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

महसूल व वन विभाग यांचेकडील ज्ञापन क्र. जमीन/३४०६/२४६८/प्र.क्र. पु १८/ज-५, दिनांक १०/३/२०१० अन्वये मौ दिघी ता. हवेली येथील स. नं. ६४ अ.पै.मधील ० ते ८० आर क्षेत्र पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस प्रचलित बाजारमूल्याची किंमत आकारून जकात नाक्यासाठी मंजूर केलेली होती. सन २०१० च्या मुल्यांकनानुसार १ कोटी ४६ लाख इतकी कब्जेहक्काची रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सदर मुदतीत शासनजमा केलेली नव्हती.

त्यामुळे शासनाच्या ज्ञापनानुसार पिपंरी-चिंचवड महानगरपालिकेस जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील पत्र दिनांक ८/९/२०१२, दिनांक १५/२/२०१३, दिनांक १३/१२/२०१५, दिनांक १२/२/२०१६ अन्वये कब्जेहक्काची रक्कम भरण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच दिनांक १३/६/२०१६ अन्वये सन २०१६ मधील शिघ्रप्रसिद्धगणकानुसार होणारी कब्जेहक्काची रक्कम रुपये ४,४४,८०,८०० (अक्षरी चार कोटी चव्वेचाळीस लाख ऐंशी हजार आठशे फक्त) इतकी शासनजमा करणेस कळविणेत आलेले होते.

त्यानुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचेकडुन रुपये ४,४४,८०,८०० इतकी रक्कम GRN NO MH ००७३८३१६३२०१६१७ M, दिनांक ११/१/२०१७ अन्वये शासन जमा करून घेणेत आलेली आहे.पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून कब्जेहक्काची रक्कम वसूल झाल्याने जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील आदेश क्र. पमह/सीआर/०८/२०१७, दिनांक १९/०६/२०१७ अन्वये मौजे दिघी, ता. हवेली, जि. पुणे येथील स. नं. ६४ अ मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जकात नाक्यासाठी ० ते ८० आर क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस हस्तांतरित करणेबाबतचे आदेश पारीत करणेत आलेले आहेत.

सबब, उक्त परिच्छेदामध्ये नमूद रु. १.४६ कोटी इतक्या वसूलपात्र रक्कम विचारात घेता पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून मूल्यांकन वसूल करावयाच्या वेळची रक्कम वसूल करण्यात आलेली असल्याने तरी सदरच्या परिच्छेद संदर्भातील अनुपालन मान्य होणेस विनंती आहे.

१.२२ परिच्छेद क्र. ४.२.३.५ सहकारी गृहनिर्माण संस्थेवर भोगवटा मूल्याची कमी आकारणी :

शासनाच्या महसूल व वन विभागाने मे, २००७ मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून वाटपाच्या आदेशाच्या तारखेला असलेले भोगवटा मूल्य, संस्थेच्या गैरशासकीय कर्मचारी असलेल्या सदस्यांचा बाबतीत त्यांच्या मासिक उत्पन्नानुसार व शासकीय कर्मचारी असलेल्या सदस्यांच्या बाबतीत त्यांच्या पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे असलेल्या पदनामानुसार ग्राह्य असलेल्या चटईक्षेत्राप्रमाणे ठरविलेल्या बाजार मूल्यावर वसूल केले जाईल.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या अभिलेखांच्या चाचणी तपासणीत आम्हाला असे आढळून आले की, महसूल व वन विभागाने त्यांच्या दिनांक १४ मार्च, २००८ च्या ज्ञापनामध्ये चारकोप, कांदिवली, मुंबई उपनगर येथे असलेल्या १,३१७,८५ चौ.मी. जागेचे वाटप एका सहकारी गृहनिर्माण संस्थेला मंजूर केले. जिल्हाधिकारी यांनी २५ मार्च, २००८ ला संस्थेला वाटप आदेश निर्गमित केले. रु. १४.३३ लाखांचे भोगवटा मूल्य २००८ या वर्षाच्या दरांच्या वार्षिक विवरण पत्राप्रमाणे संस्थेला जमीन देण्याच्या वेळी, संस्थेशी सुरुवातीला नोंदणीकृत झालेल्या १५ सभासदांना अनुज्ञेय असलेल्या ७२९.२७ चौ.मी. या चटईक्षेत्राच्या आधारावर ठरविले गेले. संस्थेकडून अशी हमी घेतली गेली की, संस्थेची सदस्य संख्या पूर्ण झाल्यानंतर ५८८.५८ चौ.मी. या उर्वरित क्षेत्राकरिता अतिरिक्त सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या चटईक्षेत्राच्या आधारावर भोगवटामूल्याचा भरणा केला जाईल. या दरम्यान, संस्थेच्या १५ सदस्यांपेकी आठ सदस्यांनी त्यांच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. जिल्हाधिकारी यांनी जाणाऱ्या सदस्यांच्या जागी आठ नवीन सदस्य पदाधिष्ठित करण्याची आणि आठ अतिरिक्त सदस्य घेण्याची परवानगी दिली (मे, २०१०) तथापि, आठ अतिरिक्त सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या चटइक्षेत्राच्या आधारावर काढलेल्या रु. ११.१३ लाखाच्या भोगवटा मूल्याची मागणी जिल्हाधिकारी यांजकडून केली गेली नाही.

आम्ही हे निदर्शनास आणल्यानंतर जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांनी अकृती मान्य केली (एप्रिल,२०१२) आणि नमूद केले की, वरील संस्थेकडून भोगवटा मूल्याची वसूली केली जाईल.

१.२३ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ५/५/२०१२ रोजीच्या पत्रान्वये लक्ष्मण नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेस कब्जेहक्काची रक्कम रु. १४,७९,७१९ शासनजमा करण्याबाबत नोटीस दिली होती. त्या अनुषंगाने संस्थेने दिनांक २२/११/२०१२ च्या प्रदानादेशाद्वारे सदरची रक्कम शासन जमा केली आहे.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी महसूल व वन (महसूल) विभागाचे विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

१.२४ परिच्छेद क्रमांक ४.२.३.१ " कृषीत्तर दराऐवजी कृषी दर लावल्यामुळे भोगवटा मूल्याची कमी आकारणी "

परिच्छेद क्रमांक ४.२.३.१ " कृषीत्तर दराऐवजी कृषी दर लावल्यामुळे भोगवटा मूल्याची कमी आकारणी " यासंदर्भात विभागाने जी माहिती दिली आहे त्यामध्ये, नोव्हेंबर महिन्यामध्ये " case has been decided " असे सांगितले आहे. याबाबत माहिती देताना जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक २३/११/२०१७ रोजी ५ कोटी १ लाख ७ हजार ४५८ रुपये एवढी रक्कम ८ दिवसांच्या आत भरणा करण्याबाबतचे आदेश पारित केले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले. त्यावर समितीने याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी असे निदेशीत केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

१.२५ परिच्छेद क्रमांक ४.२.३.२ : " कृषीत्तर दराऐवजी कृषी दर लावल्यामुळे भोगवटा मूल्याची कमी आकारणी "

पाच जिल्हाधिकारी कार्यालयातील जमीन वाटपांच्या प्रकरणात प्रकरणांच्या चाचणी तपासणीत जानेवारी, २००७ आणि जून, २०१० या दरम्यान असे आढळून आले की, ७७ प्रकरणांपैकी ११ प्रकरणांत शासकीय जमिनींचे वाटप कृषीत्तर हेतूकरिता जसे शाळा, महाविद्यालये, नवीनीकरण करण्याजोगे ऊर्जा प्रकल्प, वीज प्रकल्प, साखर कारखाने व इतर वाणिज्यिक हेतूकरिता केले गेले आणि आकारणी केले गेलेले एकूण भोगवटा मूल्य रु. ७.६५ कोटी होते जे कृषीत्तर दराऐवजी, दरांच्या वार्षिक विवरणपत्रांत विहित केलेल्या कृषीदराप्रमाणे होते, कृषित्तर दर लावून भोगवटा मूल्य रु. ३९.७६ कोटी होते. पालघर येथील रेल्वेच्या प्रकरणामध्ये विभागाने अगोदरच जास्तीचा निधी म्हणजे १ कोटी २ लाख रुपयाऐवजी १ कोटी ६ लाख रुपये असे घेतले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी सदर बाब मान्य केली.

दुसऱ्या प्रकरणी पुणे जिल्ह्याच्या परिस्थितीची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पुणे जिल्ह्यातील एकूण ४ प्रकरणे आहेत. पहिले प्रकरण मौजे नेर, ता. मुळशी येथील सोमेश्वर फाउंडेशनशी निगडित आहे. यामध्ये महालेखाकारांनी अकृषिक दराने आकारणी न केल्यामुळे ४८ लाख २० हजार रुपयांचा फरक वसूल केला पाहिजे व १५ लाख २४ हजार ३२५ रुपये व्याजापोटी वसूल केले पाहिजेत असे अभिप्राय महालेखाकारांनी दिले होते. तथापि, विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले की, संबंधितांनी या जागेचा वापर न केल्यामुळे शर्तभंग झाला व त्यामुळे जिल्हाधिकारी, पुणे यांनी ती दिनांक १० नोंव्हेंबर, २०१७ रोजी शासन जमा केलेली आहे.

स्पेसिफिक याच केसमध्ये विभागाने जमीन शासन जमा केली व इतर सर्व ठिकाणी नोटीस पाठविली आहे. सुरुवातीला यामध्ये काही प्रमाणात पैसेदेखील भरलेले आहेत. ही जमीन ताब्यात घेण्याचे स्पेसिफिक कारण काय? अशी समितीने विचारणा केली असता सन २००८ साली मौजे नेर, ता. मुळशी, जि. पुणे ही जागा शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आली होती. तेव्हापासून आजपर्यंत सदरहू जागेचा दिलेल्या प्रयोजनासाठी वापर केला नाही. हा शर्तभंग समजून त्या जागेचा ताबा घेतलेला आहे असून ती सरकार जमा केली आहे व ७/१२ मध्ये विभागाचे नाव लावले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीने मौजे तुळापूर, ता. हवेली, जि. पुणे याबाबत माहिती विचारली असता, मौजे तुळापूर, ता. हवेली, जि. पुणे येथे शासनाने सन २०१० मध्ये ही जागा घनकचऱ्यापासून बनवावयाच्या रिन्युएबल एनर्जी जनरेशन प्रकल्पासाठी पुणे महानगरपालिकेस दिली होती. ही एकूण २५ हेक्टर एवढी जागा होती. स्थानिक ग्रामस्थांचा विरोध असल्यामुळे यापैकी १९.९० हेक्टर जागा मागे घेण्यात आली आहे. ती जागा महसूल विभागाने वन विभागाकडे परत केली आहे. वन विभाग पिंपरी सांडस या ठिकाणची दुसरी १९.९० हेक्टर जागा महापालिकेस याच प्रयोजनासाठी दिली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

२५ हेक्टरपैकी ५.१० हेक्टर जागा पुणे महानगरपालिकेने घेतली व १९.९० हेक्टर जागा विभागाने वन विभागास दिली. जर पूर्ण २५ हेक्टर जमीन महापालिकेस दिली असती तर त्याबदल्यात त्यांच्याकडून विभागाला पैसे मिळाले असते. यामध्ये जग्लरी अशी झाली की, ५.१० hectare you transferred to the Municipal Corporation and १९.९० hectare was transferred to the Forest Department आणि वन विभागाने त्यांना दुसरी जागा दिली. शेवटी वन विभागाने त्यांच्याकडून पैसे घेतले नाही व महसूल विभागाने त्यांच्यासाठी १९.९० हेक्टर जमीन दिली. अशी विचारणा समितीने केली असता त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, वन विभाग पिंपरी, सांडस येथे महापालिकेस जी जागा देत आहे त्याबदल्यात नियमानुसार वन विभागामार्फत वसुली करण्यात येणार आहे. ती जागा मोफत दिली जाणार नाही.

वन विभागाकडून १९.९० हेक्टर जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू आहे. समितीने उर्वरित ५.१ हेक्टर जमिनीची रक्कम महसूल विभागाने वसूल करण्याबाबत काय कार्यवाही केली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, पुणे मनपाने विभागाकडे १ कोटी ३१ लक्ष ६२ हजार २५६ रुपये अगोदरच जमा केलेले आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

५.१ हेक्टर जमिनीपोटी विभागाला पुणे मनपाकडून किती रक्कम घ्यायची आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने घेतलेल्या माहितीनुसार सन २०१० सालीचे या जमिनीचे मुल्यांकन २७ लाख ८८ हजार ९८० रुपये एवढे येते. त्यामुळे ही रक्कम त्यांनी जमा केलेल्या रकमेपेक्षा कमी आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

मौजे वढु खुर्द, तालुका हवेली, जि. पुणे येथील जागेबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ही जागादेखील रिन्युएबल एनर्जी जनरेशन प्रकल्पासाठी पुणे महापालिकेस देण्यात आली होती. हीदेखील २५ हेक्टर एवढी जागा होती. यामध्येदेखील वढु येथील ग्रामस्थांच्या तीव्र विरोधामुळे अद्यापपर्यंत जमिनीचा प्रत्यक्षात ताबा देण्यात आलेला नाही.

प्रत्यक्ष ताबा पुणे महानगरपालिकेने घेतला नाही की, विभागाने जमीन परत घेतली नाही? अशी विचारणा समितीने केली असता, पुणे महानगरपालिकेस ताबा देण्यात आलेला नाही, जागा विभागाकडेच आहे. यासाठी वढु येथील ग्रामस्थांचा खूप विरोध आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दौंड शुगर प्रायव्हेट लिमिटेड बाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, कदम वस्ती, आलेगाव, ता. दौंड, जि. पुणे येथील फरकाची १ कोटी ५० लाख ९० हजार ५०० रुपये एवढी रक्कम कारखान्याकडून वसूल केली आहे. केवळ व्याजाची ७० लाख १७ हजार ८३ रुपये एवढी रक्कम वसूल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मुद्दलीमधील फरक वसूल करण्यात आलेला आहे.

दिनांक २ फेब्रुवारी रोजी दौंड, शुगर प्रा. लि. (साखर कारखाना) यांना नोटीस दिल्यानंतर विभागाने काय कारवाई केली? अशी विचारणा समितीने केली असता, अद्यापपर्यंत वसुली पूर्ण झालेली नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

नोटीस देऊन आता नऊ महिन्यांचा कालावधी झाला आहे. पुढील कारवाई काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सक्तीच्या मार्गाने पैसे वसूल करण्याची पुढील प्रक्रिया गरज भासल्यास अवलंबावी लागेल. अद्यापपर्यंत वसुली झालेली नसून त्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांना विभागाकडून सल्ला देण्यात येईल.

जालना येथील प्रकरणामध्ये अद्याप ६३ हजार रुपयांची बाकी आहे का? यामध्ये ५ लाख ९६ हजार रुपये वसूल करायचे होते, परंतु विभागाने ५ लाख ३३ हजार रुपये वसूल केलेले आहेत. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडे सन २०१४ सालीचे महालेखाकारांचे जे अभिप्राय आहेत त्यामध्ये ५ लाख ३३ हजार रुपयांबाबतचा कम्प्लायन्स मौ.बेलगाव, ता. अंबड, जि. जालना येथील म.रा.वि.वितरण कंपनीस कळविला होता. महालेखाकार कार्यालयाने त्यामध्ये असे नमूद केले होते की, “ Compliance in respect of only Jalna District has been furnished. Further progress of recovery made by other five Collector may be intimated to audit.” . त्यावेळी महालेखाकार कार्यालयाने उर्वरित रक्कम वसूल करण्याचा मुद्दा उपस्थित केला नव्हता.

विभागाला माहिती आहे की, ५ लाख ९६ हजार वसूल करायचे आहेत व विभागाने महालेखाकार कार्यालयास सांगितले की, ५ लाख ३३ हजार वसूल झाले आहेत. उर्वरित रक्कम वसूल करा किंवा नाही हे महालेखाकार कार्यालयाने सांगितल्यानंतरच विभागाने वसूल करणार का? हे विभागाने स्वत:हून केले पाहिजे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता, विभागाने जे कॅल्क्युलेशन केले होते त्यानुसार फरकाची रक्कम ५ लाख ३३ हजार एवढी होती व ती वसूल झालेली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

मग ही ५ लाख ९६ हजार व ५ लाख ३३ हजार ची नेमकी काय वस्तुस्थिती आहे? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत विभागाकडून शहानिशा करण्यात येईल. कारण विभागाच्या कॅल्क्युलेशनप्रमाणे ५ लाख ३३ हजार ही फरकाची रक्कम होती. महालेखाकार यांनी कोणत्या आधारावर ५ लाख ९६ हजार म्हटले आहे याची विभागाकडून शहानिशा करण्यात येईल व आवश्यक असल्यास वसुली करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नाशिक येथील प्रकरणाबाबत माहिती सांगताना विभागीय सचिवांनी सांगितले की, नाशिक येथील मौजे आडगांव, ता. नाशिक प्रकरणातील म.रा.विद्युत पारेषण कंपनी यांच्याकडून फरकाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

समितीने नागपूर जिल्ह्यातील प्रकरणाबाबतची विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, नागपूर जिल्ह्यामधील एकूण तीन प्रकरणे आहेत. यामध्ये पहिले प्रकरण मौजे घोटी, तालुका नागपूर (ग्रामीण) येथील आहे. त्यामध्ये विभागाने २००८ साली जागा दिली होती. त्यावेळी दिनांक ३०/०६/१९९२ च्या प्रचलित धोरणानुसार त्याची किंमत आकारण्याचे ठरविले होते. यामध्ये अद्यापपर्यंत अकृषीक वसुली होऊ शकलेली नाही. या प्रकरणी विभागाला किती वसुली करायची आहे? विभागाने अभियांत्रिकी महाविद्यालय व इतर शैक्षणिक प्रयोजनांकरिता सेमाना विद्या व वन विकास शिक्षण मंडळ संस्थेकडून १ लाख २७ हजार ५०० रुपये वसूल केलेले आहेत. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, विभागाच्या कॅल्क्युलेशनप्रमाणे २२ लक्ष ९५ हजार व त्यावरील व्याज अशी रक्कम वसूल करायची आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

अभियांत्रिकी महाविद्यालय व इतर शैक्षणिक प्रयोजनांकरिता सेमाना विद्या व वन विकास शिक्षण मंडळास नोटीस दिल्याचे किंवा इतर काहीही रेकॉर्डवर नाही. विभागाने सांगितलेला २२ लाख रुपयांचा आकडादेखील समितीच्या रेकॉर्डवर नाही. तसेच याबद्दलचा कोणताही रिप्लायदेखील नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, या प्रकरणामध्ये वसुलीची कार्यवाही झालेली नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

वसुलीची कार्यवाही का झालेली नाही? व त्याची कारणे काय आहेत? सन २०११-१२ चा हा लेखापरिक्षण परिच्छेद आहे. लेखापरिक्षण परिच्छेद आल्यानंतर देखील कारवाई का झालेली नाही असे समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये मंजुरी आदेश दिनांक १४/०३/२००८ रोजी काढण्यात आला होता व शासनाचा टप्पा पद्धतीचा शासन निर्णय हा दिनांक २९/०४/२००८ चा आहे. त्यामुळे या प्रकरणामध्ये वसुली करावी लागणार नाही, अशी जिल्हा प्रशासनाची भूमिका होती. मात्र, विभाग याबाबत स्पष्ट करणार आहे की वसूली करावी लागणार नाही असा अर्थ जिल्हा प्रशासनाला काढता येणार नाही व या प्रकरणीदेखील अकृषीक दराने वसुली करावी लागेल. यामध्ये अकृषीक व कृषीक दराचा फक्त २२ लाख रुपयांचा फरक आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवून विभागाच्या कॅल्क्युलेशनमध्ये २२ लाख ९५ हजार रुपये एवढी रक्कम आली आहे असे समितीस अवगत केले. यामध्ये २५ टक्के हे ५ लाख १० हजार रुपये एवढे घेतले आहेत. २२ लाख रुपयांचा आकडा हा ॲग्रीकल्चरचा दर आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर धोरण हे सन १९९२ या वर्षाचे आहे. या धोरणात असे नमूद आहे की, जमीन मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकाच्या लगत पूर्वी पाच वर्ष आधी जी जमिनीची किंमत असेल ती आधारभूत धरण्यात येते. सदरील प्रकरणात जमीन मंजुरीचे आदेश सन २००८ चे आहेत. म्हणजे १ जानेवारी २००३ ची जी किंमत असेल त्यानुसार सदरील जमिनीचे मूल्यांकन होणार आहे. त्यामुळे मूल्यांकनाची रक्कम कमी दिसते. सदरील बाबतीत एवढा फरक कसा असणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरील फरकाची किंमत २२ लाख रुपये आहे तसेच त्यावरील व्याज आहे.

Interest will be levied from the year २००८ or from the date of demand? अशी विचारणा समितीने केली असता, व्याजाची जी रक्कम आहे ती मागणीच्या तारखेनुसार वसूल केली जाईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

सदरील प्रकरणी दहा वर्षाचा विलंब झालेला आहे त्यामुळे ४४ लाख रुपये व्याज मिळालेले नाही. अजूनही विभागाने आदेश दिलेले नाहीत. विभागाने साक्षीमध्ये आता आदेश देण्यात येणार असल्याचे सांगितले आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, सदरील प्रकरणी अशी एक धारणा होती की सदरील आदेश पूर्वीचा आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

तथापि, सदरील प्रकरणी दिनांक २९/४/२००८ चा आदेश लागू नाही असे विभागाकडूनच सांगण्यात आलेले आहे असे समितीने नमूद केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरील प्रकरणी सबंधितांची अशी धारणा होती पण तसे नसल्याचे त्यांना आता कळविण्यात येणार आहे. आतापर्यंत त्यांना कळविण्यात आलेले नव्हते. या अनुषंगाने समितीने सूचित केले की, सदरील प्रकरणी संबंधितांना तसे कळवून पुढील पंधरा दिवसांच्या आत वसुलीची कार्यवाही सुरू करण्यात यावी.

एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनीबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून खैरीखूर्द या ठिकाणी महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांना ऊर्जा प्रकल्पाकरिता जमीन दिली होती. सदरील कंपनीला प्रत्यक्षात त्यांना ९.१३ हेक्टर जमीन देण्यात आली होती. सदरील जमिनीच्या फरकाची जी किंमत विभागाकडून काढण्यात आलेली आहे ती ४,८४,५६,४६० रुपये आहे. त्यापैकी २,७४,०३,००० रुपये एवढी रक्कम सदरील कंपनीने भरली आहे. उर्वरित जी रक्कम २,१०,००,००० रुपये आहे ती वसूल करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी अहवाल दिलेला आहे आणि वसुलीची प्रक्रिया हाती घेण्यात येत आहे. या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, उर्वरित रक्कम वसूल करण्याकरिता पत्रव्यवहार केला आहे की करण्यात येणार आहे? यावर उर्वरित रक्कम वसूल करण्याकरिता अद्याप पत्रव्यवहार सुरू करण्यात आलेला नाही तो आता सुरू करण्यात येणार आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. यासंदर्भात सदरील प्रकरणी तात्काळ कार्यवाही सुरू करण्यात यावी असे समितीने निदेश केले असता, संबंधितांना सूचना देण्यात येतील असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

CRPF जागेबद्दल माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, CRPF ची जागा होती ती सन २००८ या वर्षी फायरिंग रेंज करिता दिली गेली होती. त्यावेळी त्यांनी १०,८८,००० रुपये एवढी रक्कम भरली होती. सदरील जमिनीचे अकृषी मूल्यांकन हे ५५,५६,००० रुपये एवढे असल्याचे कळविण्यात आलेले आहे. सदरील जमीन प्रकरणी फरकाची जी रक्कम आहे ती ४४,६८,००० रुपये आणि व्याजाची रक्कम ४०,५६,९९४ अशी एकूण ८५,२४,९४४ रुपये इतकी रक्कम वसूल करण्याकरिता जिल्हाधिकारी यांनी दिनांक ०३/११/२०१७ रोजी सुधारित आदेश दिलेले आहेत. त्यानुसार CRPF ला तसे कळविण्यात आलेले आहे. सदरील आदेशानुसार वसुलीची प्रक्रिया होणार आहे.

उपनिबंधक वर्ग-२ यांच्याकडून सदरील प्रकरणी सन २०१० मध्ये वेगळा दर सांगण्यात आला आणि सन २०१६ मध्ये वेगळा दर सांगण्यात आलेला आहे. त्यानंतर जिल्हा सहायक उप निबंधक यांनी ५५ लाख रुपये दर सांगितलेला आहे. याचाच अर्थ एकाच बाबीचे तीन तीन दर विभागाकडे आलेले आहेत. शेवटी विभागाकडून ८५ लाख रुपयांची मागणी करण्यात येत आहे. दोन वेळा एकाच व्यक्तीने सदरील दराबाबत विभागाला अहवाल दिलेला आहे त्यानंतर जिल्हा उप निबंधकाकडून सदरील प्रकरणी वेगळा अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानंतर जो अहवाल प्राप्त झालेला आहे तो पूर्ण चुकीचा आहे. विभागाकडून मात्र शेवटचा अहवाल म्हणजे ५५ लाख रुपये दराचा जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्यास ग्राह्य धरण्यात आले आहे. या प्रकारचे फेरबदल का झालेले आहेत? आणि असे फेरबदल पुन्हा होऊ नयेत याबाबत विभागाकडून काय उपाययोजना करण्यात आलेली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, रेडी रेकनरचा वापर मूल्यांकन

करताना कसा करावा याबद्दल पूर्वीचे शासनाचे जे आदेश होते त्यामध्ये जमीन मंजुरीबाबत शासन जेव्हा आदेश काढत होते त्यात रेडी रेकनरमधील कृषी दर घ्यावा किंवा संभाव्य कृषी दर घ्यावा की अकृषीक दर घ्यावा याबाबत कोणतीही स्पष्टता नव्हती. सदरील दराबाबत स्पष्टता नसल्यामुळे काही प्रकरणी असे झालेले आहे की, आणि आता जे समितीसमोर येत आहेत त्यात कृषी दर लावून मूल्यांकन करण्यात आलेले आहे. अशा पद्धतीने चुकीचे मूल्यांकन यापुढे होऊ नये याकरिता शासनाने आता एक सविस्तर असा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सदरील शासन निर्णय हा २० फेब्रुवारी २०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. समितीच्या परवानगीने सदरील शासन निर्णयाची प्रत समितीस सादर करण्यात आली आहे.

सदरील शासन निर्णयाचे उद्दिष्ट काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, सदरील शासन निर्णयामध्ये असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, जमीन जर नागरी क्षेत्रामध्ये असेल तर त्या जमिनीचे रेडी रेकनरच्या सहाय्याने मूल्यांकन कसे करावे, जमीन जर ग्रामीण भागामध्ये असेल तर तिचे मूल्यांकन कसे करावे याबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. यापुढे सदरील प्रकरणी कोणतीही संभ्रम निर्माण होणार नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.२६ परिच्छेद क्रमांक ४.२.३.३ " चुकीचे बाजार मूल्य लावल्यामुळे भोगवटा मूल्याची चुकीची आकारणी " :

महसूल व वन विभागाने, कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे महामंडळ यांना कृषी हेतूसाठी " सुकळी संग्राहक लघुपाटबंधारे योजना " या योजनेसाठी भोगवटा तत्त्वावर जमिनीचे वाटप केले होते. (ऑगस्ट २००९) वाटपाच्या आदेशानुसार भोगवटा मूल्याची वसुली २००८ वर्षाच्या दराच्या वार्षिक विवरणपत्रात विहित केलेल्या प्रचलित बाजार मूल्याप्रमाणे जे २००९ या वर्षासाठी लागू होते, करावयाची होती. त्यानुसार उप निबंधकाने कळविलेल्या बाजार मूल्याच्या आधारावर रुपये ३३.८३ लाख इतक्या भोगवटा मूल्याची आकारणी केली गेली. तथापि, असे दिसून आले की, हे बाजार मूल्य २००९ या वाटपाच्या दराऐवजी २००७ या वर्षाचा दर लावून काढले होते. २००९ या वर्षाच्या वार्षिक विवरणपत्रातील कृषी दराचा अंगिकार करून अचूक भोगवटा मूल्य रुपये ३९.८० लाख एवढे येते. याचा परिणाम भोगवटा मूल्याच्या रुपये ५.९७ लाख इतक्या कमी आकारणीत झाला. जिल्हाधिकारी, अकोला यांनी त्यांच्या दिनांक १७ जून, २०१२ च्या पत्रान्वये कळविले आहे की जमिनीच्या किमतीतील फरक रु. ५,९७,००० व त्यावरील सन २०१०, २०११ व २०१२ च्या व्याजापोटी रु. १,८१,४६४ असे एकूण रु. ७,७८,४६४ दिनांक १६/१०/२०१२ रोजी शासनास जमा केले आहेत. त्यामुळे सदरील प्रकरणी वसुली झालेली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. सदरील प्रकरणी वसुली झाली असली तरी महालेखाकार यांच्याकडून प्रत्येक प्रकरणाची तपासणी करण्यात येत नाही. त्यामुळे महालेखाकारांनी शेरा दिला तरच वसुली होते. त्यांच्याकडून फक्त काही प्रकरणे नमुन्यादाखल तपासण्यात येतात. त्यामुळे सर्वसमावेशक अशी यंत्रणा असली पाहिजे. नाही तर मोठ्या प्रमाणात शासनाच्या महसुलाचे नुकसान होऊ शकते असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक २० फेब्रुवारी २०१८ चा शासन निर्णय हा याच हेतूने काढण्यात आलेला आहे की, क्षेत्रीय पातळीवर सदरील प्रकरणी कोणत्याही प्रकारचा संभ्रम राहू नये.

१.२७ परिच्छेद क्र. ४.२.३.४ " वाटपाचे अंतिम आदेश निर्गमित न केल्यामुळे भोगवटा मूल्याची वसुली न होणे " :

मौ.दिघी, ता. हवेली, जि. पुणे येथील पिंपरी-चिंचवड जकात नाक्यासंबंधी माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरील प्रकरणी देखील वसुली पूर्ण झालेली आहे. पुणे-चिंचवड महानगरपालिकेकडून (PCMC) वसुली करावयाची होती. सदरील प्रकरणी वसुली करावयाच्या रकमेचा सन २०१७ मध्ये आदेश काढण्यात आलेला आहे. सदरील प्रकरणी ४,४४,८०,८०० रुपये वसूल करण्यात आलेले आहेत.

१.२८ परिच्छेद क्र. ४.२.३.५ " सहकारी गृहनिर्माण संस्थेवर भोगवटा मूल्याची कमी आकारणी " :

चारकोप, कांदिवली, मुंबई उपनगर येथे असलेल्या १,३१७.८५ चौ.मी. जागेचे वाटप एका सहकारी गृहनिर्माण संस्थेला मंजूर केले. जिल्हाधिकारी यांनी २५ मार्च, २००८ ला संस्थेला वाटप आदेश निर्गमित केले. रु. १४.३३ लाखांचे भोगवटा मूल्य २००८ या वर्षाच्या दरांच्या वार्षिक विवरण पत्राप्रमाणे संस्थेला जमीन देण्याच्यावेळी, संस्थेशी सुरुवातीला नोंदणीकृत झालेल्या १५ सभासदांना अनुज्ञेय असलेल्या ७२९.२७ चौ.मी. या चटईक्षेत्राच्या आधारावर ठरविले गेले. संस्थेकडून अशी हमी घेतली गेली की संस्थेची सदस्य संख्या पूर्ण झाल्यानंतर ५८८.५८ चौ.मी. या उर्वरित क्षेत्राकरिता अतिरिक्त सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या चटईक्षेत्राच्या आधारावर भोगवटा मूल्याचा भरणा केला जाईल. या दरम्यान, संस्थेच्या १५ सदस्यांपैकी ८ सदस्यांनी त्यांच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. जिल्हाधिकारी यांनी जाणाऱ्या सदस्यांच्या जागी आठ नवीन सदस्य पदाधिष्ठित करण्याची आणि आठ अतिरिक्त सदस्य घेण्याची परवानगी दिली (मे, २०१०). तथापि, आठ अतिरिक्त सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या चटईक्षेत्राच्या आधारावर काढलेल्या रु. ११.१३ लाखाच्या भोगवटा मूल्याची मागणी जिल्हाधिकारी याकडून केली गेली नाही.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ५/५/२०१२ रोजीच्या पत्रान्वये लक्ष्मण नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेस कब्जेहक्काची रक्कम रु. १४,७९,७१९ शासन जमा करण्याबाबत नोटीस दिली होती. त्या अनुषंगाने संस्थेने दिनांक २२/११/२०१२ च्या प्रदानादेशाद्वारे सदरची रक्कम शासन जमा केली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी संपूर्ण वसुली झालेली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

समितीला यापूर्वीच्या विषयाशी संबंधित काही बोलावयाचे नसून नवीन मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्यामुळे आजपर्यंत जे प्रकार घडले आहेत ते यापुढे होणार नाहीत. सदरील मार्गदर्शक सूचना ह्या मूळ आधार म्हणून असतील. सदरील प्रकरणात त्यांच्या त्या प्रश्नाचे उत्तर जास्त गंभीर आहे. महालेखापाल यांनी नमुन्यादाखल घेतलेल्या प्रकरणातून पुढे आलेली ही उदाहरणे आहेत. अशा प्रकारे पूर्वी सदरील बाबीचा गैरवापर कित्येक वेळा झाला असावा असा त्याचा अर्थ निघतो. सदरील प्रकरणांसारखी इतरही कितीतरी प्रकरणे असू शकतात. कारण महालेखापाल यांच्याकडून सर्व प्रकरणे तपासण्यात येत नाहीत. पूर्ण राज्यभरातील सर्व प्रकरणे तपासणे त्यांना शक्यही होणार नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन विभागाने ज्या आता मार्गदर्शक सूचना सन २०१६ मध्ये दिलेल्या आहेत त्यात गैरवापर करता येईल अशा बाबी नाहीत याची खात्री केली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक २० फेब्रुवारी २०१६ च्या शासन निर्णयानंतर सदरील प्रकरणी कोणत्याही प्रकारच्या हस्तक्षेपास वाव मिळणार नाही. यासाठी देण्यात आलेले आदेश हे सुस्पष्ट असे आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीपुढे आणखी एक विषय आलेला आहे की विभागाकडून जी जमीन भाडेपट्टयाने देण्यात येते तिची नोंदणी होत नाही. नोंदणी न झाल्यामुळे शासनाच्या मुद्रांक शुल्काची वसुली कमी होते. सदरील सर्व प्रकरणी अभिलेखे तयार करण्यामागे शासनाची काय भूमिका आहे? ज्या जमिनी भाडेपट्ट्याने देण्यात येतात त्यांचे अभिलेखे वेळेवर तयार करण्यात येत नाहीत फक्त भाडेपट्ट्याचे आदेश देण्यात येतात त्यामुळे शासनाला मुद्रांक शुल्क मिळत नाही असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, विभागाचा जो नोंदणी कायदा आहे त्यामध्ये शासन एक पक्षकार असतो. त्यामुळे शासनाकडून होणारे जे भाडेपट्टे आहेत त्यांची नोंदणी होणे अनिवार्य नाही मात्र त्यांच्यावरील योग्य मूल्याचे मुद्रांक शुल्क वसूल करणे आवश्यक आहे. जो भाडेपट्टा करार असतो तो शासकीय जमिनीचा असतो. यामध्ये शासन एक पक्षकार असतो आणि जो भाडेकरू असतो तो दुसरा पक्षकार असतो. ज्याअर्थी शासन एक पक्षकार आहे त्याअर्थी अशा भाडेपट्टयांची उप निबंधक यांच्याकडे जाऊन नोंदणी करणे अनिवार्य नाही किंवा तशी आवश्यकता नाही. मात्र अशा प्रकारच्या भाडेपट्टयांवर जो मुद्रांक शुल्क आहे तो वसूल करणे आवश्यक आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरील प्रकरणी मोठ्या प्रमाणावर मुद्रांक शुल्क वसूल करण्यात येत नाही. “ Loss of revenue due to non-adherence to Government norms for registering the Agreement ” अशा स्वरूपाचा लेखा आक्षेप परिच्छेद समितीसमोर आला होता असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, “ registering ” हा जो शब्द आहे तो वापरणे योग्य नाही. कारण की, मुद्रांक शुल्क वसूल केले पाहिजे, येथपर्यंत ठीक आहे.

सर्व करारांचे मुद्रांक शुल्क वसूल झाले पाहिजे याबद्दल शासनाची काही भूमिका आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, यापूर्वी सदरील संदर्भाने क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आलेले होते. तरी त्या निर्देशांचा पुनरूच्चार समितीसमोर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

परिच्छेद क्र. ४.२.३.१ "कृषितर दराऐवजी कृषि दर लावल्यामुळे भोगवटा मुल्यांची कमी आकारणी"

अभिप्राय व शिफारशी :

१.२९ पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील प्रतिष्ठानला तहसील अहमदनगरमधील वडगाव गुप्ता येथील ३०.६१७४ हेक्टर जमीन शैक्षणिक प्रयोजनासाठी जानेवारी, १९८७ मध्ये देण्यात आली. परंतु, जमीन कृषीतर प्रयोजनासाठी वाटप केलेली असतानाही त्यावर कृषी दर आकारल्यामुळे भोगवटा मुल्याची कमी आकारणी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविले आहेत. या अनुषंगाने विभागाने रु. ५.०१ कोटीइतकी व्याजासह फरकाची रक्कम शासनजमा करणेबाबत सदरहू संस्थेला कळविले असता त्या नोटीसच्या विरोधात या संस्थेने मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे सन २०१४ मध्ये रीट याचिका दाखल केली.

१.३० सदरहू प्रकरणी न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेवर अंतिम निर्णय झालेला असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अतः या प्रकरणी न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

परिच्छेद क्र. ४.२.३.२ " कृषितर दराऐवजी कृषि दर लावल्यामुळे भोगवटा मुल्याची कमी आकारणी "

१.३१ अभिप्राय :

महालेखाकारांनी राज्यातील पाच जिल्हाधिकारी कार्यालयांतील जमीनवाटपाच्या सन २००७-१० या कालावधीतील प्रकरणांची तपासणी केली असता ७७ प्रकरणांपैकी एकूण ११ प्रकरणांमध्ये शासकीय जमिनीचे वाटप कृषितर हेतूकरिता जसे शाळा, महाविद्यालये, नवीनीकरण करण्याजोगे ऊर्जा प्रकल्प, वीज प्रकल्प, साखर कारखाने व इतर वाणिज्यिक हेतू करिता केले गेले आणि आकारणी केले गेलेले एकूण भोगवटा मूल्य रु. ७.६५ कोटी होते जे कृषितर दराऐवजी, दरांच्या वार्षिक विवरणपत्रांत विहीत केलेल्या कृषिदराप्रमाणे होते. कृषितर दर लावून भोगवटा मूल्य रु. ३९.७६ कोटी इतके असून अनुदेशांचे पालन न करण्याचा परिणाम रु. ३२.११ कोटी एवढ्या भोगवटा मुल्याच्या कमी आकारणीत झाला असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत.

या ११ प्रकरणांसंदर्भात समितीने विस्तृत चर्चा केली. मे २००६ मध्ये निर्धारित केलेल्या शासन ठरावानुसार, भोगवटा तत्त्वावर किंवा भाडेपट्टा तत्त्वावर शासकीय जमिनीचे वाटप करण्याकरीता आणि जेथे शासकीय जमिनीचे मुल्यांकन करावयाचे आहे अशा सर्व प्रकरणांमध्ये, मुल्यांकन, ASR मध्ये ज्या तारखेला शासकीय जमिनीच्या वाटपाचे आदेश दिले गेले त्या तारखेला विहीत केलेल्या दरांप्रमाणे किंवा मुल्यांकन करण्याकरीता झालेल्या इतर आदेशाप्रमाणे ठरविले जाईल. ASR च्या अनुदेशानुसार जर ग्रामीण क्षेत्रात असलेली शासकीय जमीन कृषितर कारणाकरीता वाटप केली गेली, तिचे बाजारमुल्य ASR मध्ये त्या प्रातांकरीता विहित केलेल्या कृषितर दराच्या ५० टक्के दराप्रमाणे ठरविले जाईल असे निश्चित करण्यात आले होते. परंतु त्याआधारे ही निश्चिती झालेली नसल्यामुळे पुढील ११ प्रकरणांमध्ये ही आकारणी आक्षेपित करण्यात आलेली आहे.

१.३२ शिफारशी :

(१) पश्चिम रेल्वे यांना मौजे उमेळमान, ता. वसई, जि. ठाणे येथे बोरिवली-विरार रेल्वे मार्गासाठी जमिनीचे वाटप करताना भोगाधिकार मुल्य कमी वसुल केल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत व दुय्यम निबंधक यांचेकडून दर्शविलेले दर (ASR पेक्षा) कमी असल्याने ASR दरानुसार ही वसुली होणे आवश्यक होती. यासंदर्भात पश्चिम रेल्वे यांचेकडून सन २००० मध्ये रु. १,०६,७३,३३६ इतक्या रकमेचा भरणा करून जमिनीचा आगाऊ ताबा देण्यात आला होता. त्यानंतर सन २००७ मध्ये सन २००६ च्या शीघ्रसिद्ध गणकानुसार कब्जेहक्काची रक्कम आकारुन उक्त जमीन मंजूर करण्याबाबत अंतिम आदेश निर्गमित करण्यात आले. त्याअनुषंगाने सन २००६ च्या शीघ्रसिद्ध गणकानुसार रक्कम निश्चित करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी पश्चिम रेल्वेकडून यापूर्वीच घेतलेली रक्कम ही जिल्हा निबंधकांनी कळविलेल्या मुल्यांकनापेक्षा जास्त असल्याने वसुलीचा प्रश्न उद्‌भवत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे हे आक्षेप वगळण्यात येत असून कोणतीही शिफारस करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

१.३३ (२) याप्रकरणी पुणे जिल्ह्यातील एकूण चार प्रकरणे आहेत.

(अ) मौजे नेर, ता. मुळशी येथील ६ एकर जमीन शैक्षणिक प्रयोजनासाठी सोमेश्वर फाऊंडेशनला देण्यात आली होती. परंतु याप्रकरणी जागेची अकृषिक दराने आकारणी न केल्यामुळे रु. ४८,२०,००० फरकाची रक्कम व त्यावर व्याजापोटी रु. १५,२४,३२५ इतकी रक्कम शासनजमा करणेबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून सन २०१६ व २०१७ मध्ये तीन वेळा नोटीस देण्यात आली. परंतु सदर संस्थेने जागेचा वापर विहित प्रयोजनासाठी अद्याप सुरु केलेला नसल्याने दि.१०.११.२०१७ रोजीच्या आदेशान्वये सदरहू जमीन शासनजमा करण्यात आल्याचे व ७/१२ मध्ये विभागाचे नाव लावल्याचे समितीसमोर

सांगण्यात आले. यासंदर्भात ७/१२ वर विभागाचे नाव लावण्यात आले परंतु जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेतलेला नसल्यास तो तात्काळ घेण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(ब) तुळापूर, ता. हवेली येथे शासनाने एकूण २५ हेक्टर जमीन पुणे महानगरपालिकेला घनकचऱ्यापासून बनवावयाच्या रिन्युएबल एनर्जी जनरेशन प्रकल्पाकरिता मंजूर करून कब्जेहक्काची रक्कम रु. १,३१,६२,२५६ घेऊन सदरची जमीन पुणे महानगरपालिकेस देण्यात आली. वास्तविकतः या जमिनीपोटी रु. १६,७८,३६,४१५ (रु. १३,४५,१५,७४४ × व्याज रु. ३,३३,२०,६७१) इतकी रक्कम घेणे आवश्यक असल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. परंतु या प्रकल्पास स्थानिक ग्रामस्थांचा विरोध असल्यामुळे सदर जमिनीवर अद्याप प्रकल्प उभा राहिलेला नाही. त्यामुळे २५ हेक्टर जमिनीपैकी ५.१० हेक्टर जमीन पुणे महानगरपालिकेने स्वतःजवळ ठेवली व १९.९० हेक्टर जमीन वन विभागास परत दिली. पुणे महानगरपालिकेस हा प्रकल्प उभारणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे पुणे महानगरपालिकेने केलेल्या विनंतीस अनुसरून वन विभागाने मौजे पिंपरी-सांडस येथील जमीन पुणे महानगरपालिकेस देण्यास तयारी दर्शविली व पिंपरी-सांडस येथील जमिनीच्या बदल्यात मौजे तुळापूर येथील जमिनीपैकी १९.९० हेक्टर आर क्षेत्र स्वीकारण्याची तयारी दर्शविली. त्यास केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाने देखील तत्वतः मान्यता दिली असल्याचे विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे. त्या अनुषंगाने पिंपरी-सांडस येथील जमीन महानगरपालिकेकडे वर्ग करण्याची कार्यवाही वन विभागामार्फत सुरु आहे. पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा प्रकल्पासाठी पर्यायी जमिनीकरिता परत केलेली २५ हेक्टरपैकी १९.९० हे.आर जमीन वगळता उर्वरित ५.१० हे.आर क्षेत्राच्या कब्जेहक्काची रक्कम मुल्यांकित करून पुणे महानगरपालिकेकडून यापुर्वी शासनजमा करण्यात आलेली रक्कम वजा करून उर्वरित वसुलपात्र रक्कम पुणे महानगरपालिकेकडून वसूल करण्यात यावी. तसेच पिंपरी-सांडस येथील पर्यायी दिलेल्या जमिनीसंदर्भात वन अधिनियमातील तरतुदीनुसार पर्यायी वनीकरणाकरिता आवश्यक देय रक्कम (NPV) वन विभागामार्फत पुणे महानगरपालिकेकडून वसूल करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(क) मौजे वढू (खुर्द), ता. हवेली येथील २५ हेक्टर जमीनदेखील घनकचरा व्यवस्थापनासाठी रिन्युएबल एनर्जी जनरेशन प्रकल्पाकरिता पुणे महानगरपालिकेस देण्यात आली होती. वढू येथील ग्रामस्थांच्या तीव्र विरोधामुळे अद्यापपर्यंत पुणे महानगरपालिकेने या जमिनीचा प्रत्यक्षात ताबा घेतलेला नसून जमीन अद्यापही विभागाकडेच असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. त्यामुळे या जमिनीसंदर्भातील योग्य तो निर्णय शासनस्तरावरून तात्काळ घेण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(ड) मौजे आलेगाव कदमवस्ती, ता. दौंड येथील ५६.७० हे.आर जमीन दौंड शुगर प्रायव्हेट लिमिटेड (साखर कारखाना) यांना देण्यात आली होती. यातदेखील जमिनीची कब्जेहक्काची रक्कम वसूल करताना बिनशेती दराप्रमाणे रक्कम न आकारल्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान झाल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. याअनुषंगाने निश्चित केलेली कब्जेहक्काची रु. १,५०,९०,५०० इतकी रक्कम दौंड शुगर प्रायव्हेट लिमिटेड यांनी दि.१९.११.२०१६ रोजी शासनजमा केली. परंतु सदर रकमेवरील व्याज रु. ७०,१७,०८३ अद्याप भरण्यात आलेले नसून त्यासंदर्भातील नोटीस देऊन वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच गरज भासल्यास सक्तीच्या मार्गाने पैसे वसूल करण्याची पुढील प्रक्रिया अवलंबिण्याबाबतदेखील विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. अतः सदरहू व्याजाची रक्कम तात्काळ वसुल करण्यात यावी. तसेच ही आकारणी चुकीच्या पद्धतीने करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर देखील योग्य ती कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.३४ (३) एकूण आक्षेपित ११ प्रकरणांपैकी दोन प्रकरणे ही जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाशी संबंधित असून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, नाशिक यांचेकडून मौजे आडगाव, ता. नाशिक येथील जमिनीच्या कब्जेहक्काच्या फरकाची रक्कम व्याजासह वसूल करण्यात आल्याचे विभागाने सांगितले. तसेच मौजे भेंडी, ता. कळवण येथील १ हेक्टर ७५ आर क्षेत्र कांदा निर्यात सुविधा केंद्रासाठी दिलेल्या जागेबाबत कब्जेहक्काच्या फरकाची रक्कम व्याजासह वसूल केल्याचे विभागाने समितीसमोर सांगितले. या प्रकरणी फरकाची व व्याजाची वसुली पुर्ण झालेली आहे. परंतु ही आकारणी चुकीच्या पद्धतीने केलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई विभागाने केली नाही. अतः या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.३५ (४) जालना जिल्ह्यातील मौजे बेलगाव, ता. अंबड येथील शासकीय जमीन उपकेंद्र उभारण्यासाठी महावितरण कंपनीस देण्यात आली होती. या प्रकरणीदेखील जमिनीचा संभाव्य अकृषिक वापर विचारात घेऊन त्यानुसार होणाऱ्या मुल्यांकनाच्या फरकाची रक्कम भरणेबाबत महावितरण कंपनीस कळविण्यात आले. त्यानुसार फरकाची रक्कम रु. ५,३३,००० भरण्यात आली असे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु महालेखाकारांच्या आक्षेपानुसार या प्रकरणी वास्तविकतः रु. ५,९६,००० भरणे आवश्यक असताना विभागाने फक्त रु. ५,३३,००० भरून घेतले. याबाबत समितीने विचारणा केली असता विभागाच्या गणनेनुसार फरकाची रक्कम रु. ५,३३,००० होती. परंतु महालेखाकार यांनी गणना केलेली रु. ५,९६,००० रकमेचा आधार काय, याबाबत विभागाकडून शहानिशा करण्यात येईल व आवश्यक असल्यास वसुली करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले. त्याअनुषंगाने या प्रकरणाची पुन्हा एकदा छाननी करून फरकाच्या रकमेची निश्चिती करण्यात यावी व त्याअनुषंगाने आवश्यक असल्यास अतिरिक्त रक्कम वसूल करण्यात यावी. तसेच या प्रकरणी सदोष आकारणीस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.३६ (५) सदरहू आक्षेपात नागपूर जिल्ह्यातील एकूण ३ प्रकरणे आढळून आली आहेत.

(अ) मौजे घोटी, नागपूर (ग्रामीण) येथे १० हेक्टर आर जमीन शैक्षणिक प्रयोजनासाठी सेमाना विद्या व वनविकास प्रशिक्षण मंडळास देण्यात आली होती. सदरहू जागेचे मंजुरी आदेश दि.१४.०३.२००८ चे असून शासनाचा टप्पा पद्धतीचा शासन निर्णय हा दि.२९.०४.२००८ चा असल्यामुळे या प्रकरणामध्ये वसुली करावी लागणार नाही अशी जिल्हा प्रशासनाची भूमिका व धारणा होती. त्यामुळे ही वसुली केलेली नव्हती असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले असता विभागाला असे करता येणार नाही. १९९२ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार जमीन मंजुरी आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्व पाच वर्ष आधीच्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या बाजारमुल्याच्या २५ टक्के रक्कम आकारणे आवश्यक होते. त्यानुसार १ जानेवारी, २००३ रोजी जमिनीची जी किंमत होती त्या दराने ही आकारणी होणे आवश्यक होते असे समितीने निदर्शनास आणले असता ही वसुली केली जाईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले. तसेच या वसुलीस १० वर्षांचा विलंब झालेला असून विभागाने अद्यापही यासंदर्भात आदेश दिलेले नाहीत. परिणामी शासनाच्या व्याजाचे मोठ्या रकमेचे नुकसान झालेले आहे. अतः यासंबंधी १५ दिवसांच्या आत वसुलीची कारवाई सुरू करावी असे समितीने निदेशित केले. त्या अनुषंगाने या प्रकरणी फरकाची रक्कम व्याजासह वसूल करण्यात यावी व या प्रकरणी सदोष आकारणी करणाऱ्या अधिकाऱ्यांवरदेखील कारवाई करण्यात यावी यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(ब) मौजे खैरी (खुर्द), ता. हिंगणा येथील एकूण १२१.०२ हे.आर जमीन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लिमिटेड, नागपूर यांना ऊर्जा प्रकल्पासाठी मंजूर करण्यात आली होती. परंतु सदर कंपनीला प्रत्यक्षात ९.१३ हे.आर इतकीच जमीन देण्यात आली. त्यासाठीची फरकाची जी रक्कम रु. ४,८४,५६,४६० विभागाने निश्चित केली होती. त्यापैकी रु. २,७४,०३,००० एवढी रक्कम कंपनीने भरलेली असून उर्वरित रक्कम रु. २,१०,५३,४६० ची वसुलीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यासंदर्भात अद्याप पत्रव्यवहारदेखील सुरू करण्यात आलेला नाही. याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली. अतः सदरहू परिच्छेदासंदर्भात वसुलपात्र रक्कम ही फार मोठी असल्यामुळे विभागाने हे प्रकरण अधिक गांभीर्याने हाताळावे. या प्रकरणी वसुलपात्र रक्कम तात्काळ वसूल करण्यात यावी. तसेच सदोष आकारणीसाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(क) मौजे खैरी (खुर्द), ता. हिंगणा येथील २.७२ हे.आर जमीन केंद्र शासनाच्या केंद्रीय रिझर्व्ह पोलीस बल, नागपूर यांना फायरींग रेंजकरिता देण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी रु. १०,८८,००० एवढी रक्कम भरली होती. त्यानंतर सदरहू मुल्यांकन चुकीचे झाल्याचे विभागाच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांनी नोव्हेंबर,२०१७ मध्ये पुनर्मुल्यांकन करून रकमेची फेरनिश्चिती करून केंद्रीय रिझर्व्ह पोलीस बल यांना कळविले. त्यानुसार कब्जेहक्काची जमा केलेली रक्कम वगळून उर्वरित रु. ४४,६८,००० व व्याजाची रक्कम रु. ४०,५६,९९४ अशी एकूण रु. ८५,२४,९४४ इतकी रक्कम शासनजमा करण्याच्या अटीवर सुधारित आदेश निर्गमित केले. त्या आदेशान्वये वसुलीची प्रक्रिया होणार असल्याचे समितीसमोर साक्षीदरम्यान सांगण्यात आले. विभागाने ही रक्कम केंद्रीय रिझर्व्ह पोलीस बल, नागपूर यांचेकडून वसूल करावी. तसेच सदरहू प्रकरणी मुल्यांकन करतेवेळी जिल्हा सहायक निबंधकाकडून वेळोवेळी वेगवेगळा दर अहवाल प्राप्त झालेला आहे.

हीदेखील गंभीर बाब आहे. मुल्यांकन करताना रेडीरेकनरचा वापर कसा करावा याची निश्चिती नसल्यामुळे या मुल्यांकनांमध्ये तफावत दिसून आली. जमीन मंजुरीबाबत पुर्वी अस्तित्वात असलेल्या शासनाच्या निर्णयांमध्ये रेडीरेकनरमधील कृषि दर घ्यावा किंवा संभाव्य कृषि दर घ्यावा किंवा अकृषिक दर घ्यावा याबाबत कोणतीही स्पष्टता नव्हती. त्यामुळे या आकारणीमध्ये अशा प्रकारची तफावत दिसून येत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. परंतु आता शासनाने दि.२०.०२.२०१६ रोजी सविस्तर शासन निर्णय निर्गमित केला असून याबाबत मुल्यांकनासाठीच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत, त्याची विभागाने तंतोतंत अंमलबजावणी करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.३७ परिच्छेद क्र. ४.२.३.३ " चुकीचे बाजारमुल्य लावल्यामुळे भोगवटा मुल्याची चुकीची आकारणी " :

अभिप्राय :

महसूल व वन विभागाने अकोला पाटबंधारे महामंडळ यांना कृषि हेतूसाठी " सुकळी संग्राहक लघुपाटबंधारे योजना " यासाठी भोगवटा तत्वावर जमिनीचे वाटप केले होते. वाटपाच्या आदेशानुसार भोगवटा मुल्याची वसुली २००८ वर्षाच्या दराच्या वार्षिक विवरण पत्रात विहित केलेल्या प्रचलित बाजार मुल्याप्रमाणे जे २००९ या वर्षासाठी लागू होते, करावयाची होती. त्यानुसार उप निबंधकाने कळविलेल्या बाजार मुल्याच्या आधारावर रु. ३३.८३ लाख इतक्या भोगवटा मुल्याची आकारणी केली गेली. तथापि हे बाजार मुल्य २००९ या वाटपाच्या वर्षाच्या दराऐवजी २००७ या वर्षाचा दर लावून काढले होते. सन २००९ या वर्षाच्या वार्षिक विवरणपत्रातील कृषी दराचा अंगिकार करून अचूक भोगवटा मूल्य रु. ३९.८० लाख एवढे येते. याचा परिणाम भोगवटा मुल्याच्या रु. ५.९७ लाख इतक्या कमी आकारणीत झाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

१.३८ शिफारस :

यासंदर्भात समितीसमोर सांगण्यात आले की, जिल्हाधिकारी, अकोला यांनी त्यांच्या दि.१७.०६.२०१२ च्या पत्रान्वये जमिनीच्या किमतीतील फरक रु. ५,९७,००० व त्यावरील व्याजापोटी रु. १,८१,४६४ असे एकूण रु. ७,७८,४६४ दि.१६.१०.२०१२ रोजी शासनास जमा केल्याचे सांगण्यात आले. सदरहू आक्षेपित रक्कम संबंधितांकडून वसूल झालेली आहे. परंतु अशाप्रकारे भोगवटा मुल्याची सदोष आकारणी करणाऱ्यांवर विभागाने कोणतीही कारवाई केली नाही. महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविले नसते तर याची दखल देखील विभागाने घेतली नसती व शासनाच्या महसुलाची मोठ्या प्रमाणात हानी झाली असती. अतः अशा प्रकारे सदोष आकारणी करणाऱ्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.३९ परिच्छेद क्र. ४.२.३.४ " वाटपाचे अंतिम आदेश निर्गमित न केल्यामुळे भोगवटा मुल्याची वसुली न होणे " :

अभिप्राय :

महसूल व वन विभागाने त्यांच्या दि.१० मार्च, २०१० च्या ज्ञापनाद्वारे मौजे दिघी, पुणे येथे असलेल्या ८००० चौ.मी. जागेचे वाटप पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला जकात नाक्यासाठी प्रचलित बाजारमुल्याने भोगवटा तत्त्वावर केले होते. मंजुरी आदेशाच्या अटी व शर्तीप्रमाणे जिल्हाधिकारी यांना पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेकडून दराच्या वार्षिक विवरणपत्रात विहित केलेल्या प्रचलित बाजारमुल्याप्रमाणे भोगवटा मूल्य वसूल करावयाचे होते. तथापि, जिल्हाधिकारी यांनी वाटप आदेश निर्गमित केले नाही तसेच भोगवटा मुल्याची वसुली केली नाही. तलाठी, दिघी यांनी जिल्हाधिकारी यांना मार्च,२०११ मध्ये दिलेल्या अहवालाप्रमाणे ही जमीन आधीच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून जकात नाक्यासाठी वापरली जात होती. सन २०१० या वर्षाच्या दराच्या वार्षिक विवरणपत्राप्रमाणे बाजार मुल्यावर रु. १.४६ कोटी इतके भोगवटा मुल्य निघते. याप्रकारे वाटपाचे आदेश निर्गमित न करणे आणि भोगवटा मुल्य वसूल न करणे याचा परिणाम रु. १.४६ कोटी एवढ्या महसुलाची हानी होण्यात झाला असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविले आहेत.

यासंदर्भात झालेल्या निर्गमन परिषदेत ही बाब पडताळली जाईल व योग्य कारवाई केली जाईल असे जिल्हाधिकारी, पुणे यांनी महालेखाकारांना जून, २०१२ मध्ये आश्वासित केले. सदरहू प्रकरणी साक्षीदरम्यान ही आक्षेपित रक्कम पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून शासनजमा करून घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

१.४० शिफारस :

सदरहू प्रकरणी महालेखाकारांनी सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी हे आक्षेप नोंदविलेले असून निर्गमन परिषदेत ही बाब पडताळून योग्य ती कार्यवाही केली जाईल असे जिल्हाधिकारी, पुणे यांनी आश्वासित करूनही ही वसुली मात्र सन २०१७ मध्ये झाल्याचे दिसून येते. अतः या प्रकरणी भोगवटा मुल्याची वसुली न करण्यामागे जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर तसेच महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतरही विहित मुदतीत ही वसुली न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.४१ परिच्छेद क्र. ४.२.३.५ " सहकारी गृहनिर्माण संस्थेवर भोगवटा मुल्याची कमी आकारणी " :

अभिप्राय :

महसूल व वन विभागाने त्यांच्या दिनांक १४ मार्च, २००८ च्या ज्ञापनामध्ये चारकोप, कांदिवली, मुंबई उपनगर येथे असलेल्या १,३१७.८५ चौ.मी. जागेचे वाटप एका सहकारी गृहनिर्माण संस्थेला मंजूर केले. जिल्हाधिकारी यांनी २५ मार्च, २००८ ला संस्थेला वाटप आदेश निर्गमित केले. रु. १४.३३ लाखांचे भोगवटा मुल्य २००८ या वर्षाच्या दरांच्या वार्षिक विवरणपत्राप्रमाणे संस्थेला जमीन देण्याच्या वेळी, संस्थेशी सुरुवातीला नोंदणीकृत झालेल्या १५ सभासदांना अनुज्ञेय असलेल्या ७२९.२७ चौ.मी. या चटईक्षेत्राच्या आधारावर ठरविले गेले. संस्थेकडून अशी हमी घेतली गेली की संस्थेची सदस्य-संख्या पूर्ण झाल्यानंतर ५८८.५८ चौ.मी. या उर्वरित क्षेत्राकरिता अतिरिक्त सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या चटईक्षेत्राच्या आधारावर भोगवटा मुल्याचा भरणा केला जाईल. या दरम्यान संस्थेच्या १५ सदस्यांपैकी ८ सदस्यांनी त्यांच्या सदस्यत्वाचा राजिनामा दिला. जिल्हाधिकारी यांनी जाणाऱ्या सदस्यांच्या जागी ८ नवीन सदस्य पदाधिष्ठित करण्याची आणि ८ अतिरिक्त सदस्य घेण्याची परवानगी दिली (मे, २०१०). तथापि, ८ अतिरिक्त सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या चटईक्षेत्राच्या आधारावर काढलेल्या रु. ११.१३ लाखाच्या भोगवटा मूल्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडून केली गेली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत.

यासंदर्भात झालेल्या निर्गमन परिषदेत विभागाने हे आक्षेप मान्य केले व वरील संस्थेकडून भोगवटा मुल्याची वसुली केली जाईल असेही सांगितले. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी उपनगर, मुंबई यांनी दि.०५.०५.२०१२ रोजीच्या पत्रान्वये लक्ष्मणनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेस कब्जेहक्काची रक्कम रु. १४,७९,७१९ शासनजमा करण्याबाबत दिलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने संस्थेने दि.२२.११.२०१२ रोजी सदरची रक्कम शासनजमा केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

१.४२ शिफारस :

(१) शासनाच्या महसूल व वन विभागाने मे,२००७ मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमिनीचे वाटप करण्याकरिता धोरण तयार केले. या धोरणानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून वाटपाच्या आदेशाच्या तारखेला असलेले भोगवटा मूल्य, संस्थेच्या गैरशासकीय कर्मचारी असलेल्या सदस्यांच्या बाबतीत त्यांच्या मासिक उत्पन्नानुसार व शासकीय कर्मचारी असलेल्या सदस्यांच्या बाबतीत त्यांच्या पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे असलेल्या पदनामानुसार ग्राह्य असलेल्या चटईक्षेत्राप्रमाणे ठरविलेल्या बाजारमुल्यावर वसूल केले जाईल असे असतानाही अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेवर भोगवटा मुल्याची आकारणी कमी करण्यात आली. महालेखाकारांनी हे आक्षेप घेतल्यानंतर ही वसुली करण्यात आली. ही बाब अतिशय गंभीर असून महालेखाकारांनी जर आक्षेप नोंदविले नसते तर ही रक्कम वसुली देखील झाली नसती व शासनाच्या महसूलाची हानी झाली असती. अतः या प्रकरणी अशाप्रकारे सदोष आकारणी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.४३ (२) महालेखाकारांनी महसूल व वन विभागांतर्गत अशाप्रकारच्या प्रकरणांची केवळ नमुन्यादाखल तपासणी केली असता विभागाने कृषितर दराऐवजी कृषि दर लावल्यामुळे भोगवटा मुल्याची कमी आकारणी, चुकीचे बाजारमुल्य लावल्यामुळे भोगवटा मुल्याची चुकीची आकारणी, वाटपाचे अंतिम आदेश निर्गमित न केल्यामुळे भोगवटा मुल्याची वसुली न होणे, सहकारी गृहनिर्माण संस्थेवर भोगवटा मुल्याची कमी आकारणी करणे असे गंभीर आक्षेप नोंदविलेले आहेत. या सर्व प्रकरणात शासनस्तरावरुन रकमेची आकारणी सदोष व कमी झाल्याचे स्पष्टपणे सिद्ध झालेले असून विभागाने त्याची वसुली देखील केलेली आहे. महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविले नसते तर विभागाने याची कोणतीही दखल घेतली नसता व एवढ्या मोठ्या महसूलास शासनाला मुकावे लागले असते. ही अतिशय गंभीर बाब असून विभागाचे अधिकारी शासनाला प्राप्त होणाऱ्या महसूलाबाबत सजग नसून अत्यंत बेजबाबदारपणे व निष्काळजीपणाने ही आकारणी करीत असल्याचे समितीसमोर सिद्ध झाले आहे. समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. परंतु महालेखाकारांनी लेखापरिक्षणाच्यावेळी राज्यातील सर्वच प्रकरणांची छाननी केलेली नसून केवळ नमुन्यादाखल काही विशिष्ट

प्रकरणांची तपासणी केल्यानंतर अशा गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत. राज्यात अशा अन्य प्रकरणीदेखील अशाचप्रकारे निश्चितरित्या आकारणी कमी झाल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे केवळ महालेखाकारांच्या आक्षेपापुरती ही वसुली मर्यादित न ठेवता विभागाने अशाप्रकारच्या दिलेल्या जागेच्या भोगवटा मुल्याच्या तफावतीबाबत सर्व प्रकरणांचे विशेष पथकाद्वारे कालबद्ध पद्धतीने लेखापरिक्षण करावे व यात आकारणी कमी झालेली असल्यास त्याची वसुली करावी व संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यांत देण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

गृह विभाग (परिवहन)

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-१२ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ५३.२ " आयात वाहनांवरील एकरकमी कराची (OTT) कमी आकारणी यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

२.२ परिच्छेद क्र. ५.३.२ " आयात वाहनांवरील एकरकमी कराची (OTT) कमी आकारणी " :

(प्रादेशिक परिवहन कार्यालय कोल्हापूर, नाशिक व ठाणे) मुंबई मोटार वाहन कर अधिनियम १९५८ नुसार भारतात आयात करून राज्यात वापरावयाच्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या मोटार गाड्यांवर आकारावयाचा एक रकमी कर OTT (one time tax) देशांतर्गत वाहनांसाठी लागू होणाऱ्या दराच्या दुप्पट आहेत.

नमुना (फॉर्म) २० व संगणकीकृत अर्ज वाहन प्रणाली वरील उपलब्ध माहितीच्या आधारे जानेवारी २०११ आणि एप्रिल, २०११ दरम्यान केलेल्या चाचणी तपासणीत महालेखाकारांच्या निदर्शनास आले की, सन २००७ -२००८ ते सन २०१०-२०११ या वर्षात परिवहनेत्तर प्रवर्गांतर्गत नोंदणी केलेली नऊ वाहने परिवहन आयुक्तांनी आयात वाहने म्हणून घोषित केली. परंतु या नऊ वाहनांच्या मालकांनी, आयात वाहनांना लागू होणाऱ्या दराऐवजी देशांतर्गत दराने एक रकमी कर भरला यामुळे रु. १६.६१ लाखाचा एकरकमी कर कमी वसूल केला गेला. तसेच विहित दराने व्याज देखील आकारणीय होते.

या बाबी महालेखाकारांनी फेब्रुवारी, २०११ व मे २०११ मध्ये विभाग/शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर, विभागाने निरीक्षणे मान्य केली आणि प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO) नाशिक यांनी चार वाहन मालकांकडून रु. ६.४५ लाख वसूल केले (सप्टेंबर २०११ ते मार्च २०१२ दरम्यान), उर्वरीत रकमेच्या वसुलीचा अहवाल प्रतिक्षाधीन आहे.

ही बाब आम्ही शासनास एप्रिल, २०१२ मध्ये कळविली, त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही. (जानेवारी २०१३).

२.३ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर परिच्छेदात दर्शविलेल्या एकूण ०९ प्रकरणांमधील १६,६१,१६० पैकी ०७ प्रकरणांत ११,४०,५९६ रक्कम वसुल करण्यात आली असून उर्वरीत ०२ प्रकरणी ५,२०,५६४ वसूलीची कार्यवाही चालू आहे.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ७ नोव्हेंबर, २०१७ रोजी गृह (परिवहन) विभागाचे विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

२.४ परिच्छेद क्र. ५.३.२ " आयात वाहनांवरील एकरकमी कराची (OTT) कमी आकारणी " :

" आयात वाहनांवरील एकरकमी कराची (OTT) कमी आकारणी " याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ९ गाड्या आयात केलेल्या होत्या मात्र त्यांच्या बाबतीत देशांतर्गत (डोमॅस्टीकचे) दर लावण्यात आले आहेत. महालेखाकारांच्या ऑडीटमध्ये ही ९ प्रकरणे आढळून आली. विभागाने ते लेखापरीक्षणाचे परिच्छेद मान्य केले व त्यानुसार संबंधितांकडून या ९ प्रकरणी कर वसुलीची कार्यवाही केली. ९ पैकी ८ गाड्यांच्या वसुलीची कार्यवाही झाली आहे. पण ९ वी बीएमडब्ल्यू गाडी ११ सीरीजची होती. त्या वर्षापासून हरियाणामध्ये बीएमडब्ल्यू गाड्यांची भारतामध्ये निर्मिती होण्यास सुरूवात झाली होती. चौकशी केल्यानंतर असे आढळून आले की, ती गाडी आयात केलेली नाही तर त्या गाडीची निर्मिती हरियाणा राज्यामध्ये झाली आहे. त्यामुळे विभागाने महालेखाकारांना विनंती केली आहे की, या गाडीच्या बाबतीत विभागाला सवलत देण्यात यावी. इतर ८ गाड्यांची विभागाने वसुली केलेली आहे.

हे प्रकरण सन २०१० चे आहे. मग विभागाने ही वसुली करण्यास कधी सुरूवात केली याबाबत विभागाने काही दंडात्मक कार्यवाही केली आहे काय आणि असल्यास ती केव्हा करण्यात आली आहे. कारण आता सन २०१७ आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हा परिच्छेद सन २०११ मधील असून त्यासंबंधी सन २०१२, २०१३ व २०१४ पर्यंत संपूर्ण वसुली केली आहे. हा महालेखाकारांनी काढलेला परिच्छेद आहे. ती गाडी आयडेंटीफाय करताना आयात केली होती किंवा देशी होती हे पाहण्याची जबाबदारी कोणाची होती? अशी विचारणा समितीने केली असता, त्या त्या क्षेत्रातील मोटर वाहन निरीक्षकाची आणि तेथील जे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाचे प्रमुख असतील त्यांची ती जबाबदारी होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.५ विभाग आपले कार्य व्यवस्थित पार पाडत नसल्यामुळे त्या ठिकाणी महालेखाकार कार्यालयाचे अधिकारी नियुक्त केले पाहिजेत किंवा विभागाने ज्या लोकांना नियुक्त केले आहे त्यांनी त्यांचे काम व्यवस्थित करायला पाहिजे. विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी जर ती गाडी आयात केलेली आहे किंवा देशी निर्मितीची आहे हे समजत असून ही आपली जबाबदारी पार पाडली नाही तर त्या अधिकाऱ्यांवर विभागाने कोणती कार्यवाही केली आहे, अशी विचारणा समितीने केली असता, ज्या अधिकाऱ्यांनी शासनाचा महसूल बुडविला आहे त्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

२.६ सन २०११ मध्ये हे प्रकरण उघडकीस आले तेव्हा शिस्तभंगाची कारवाई करणे अपेक्षित होते. तत्कालीन परिवहन आयुक्तांनी याबाबतीत जो निर्णय घेतला आहे त्यांच्यावर विभागाने कोणती कार्यवाही केली आहे? तेव्हाचे जे प्रादेशिक परिवहन अधिकारी व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आहेत त्यांनी त्यांची जबाबदारी नियमानुसार पार पाडली नाही. कारण केवळ आयात केलेल्या ८ ते ९ गाड्यासंदर्भातील एक रकमी कर वसूलीचा प्रश्न होता तो पार न पाडणे ही अतिशय गंभीर बाब आहे. ज्या अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे शासनाचा महसूल बुडविला आणि ज्यांना त्यांचे काम माहिती असून त्यांनी जबाबदारी पार पाडली नसेल तर त्यांच्या बाबतीत विभागाने कोणती कार्यवाही केली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांच्या बाबतीत शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे.

२.७ सन २०११-१२ मध्ये महालेखाकारांनी विभागाच्या निदर्शनास आणल्यानंतर विभागाने सन २०१२, २०१३ आणि सन २०१४ मध्ये त्या ८ गाड्यांच्या मालकांकडून जी दंडात्मक रकमेची वसुली करायची होती ती केली आहे. या प्रकरणी एक तर विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले पाहिजे की, या विदेशी बनावटीच्या गाड्या आहेत त्यांच्यावर त्या प्रमाणात नियमानुसार अतिरिक्त टॅक्स वसूल केला पाहिजे. त्यामुळे ज्यांनी तो टॅक्स वसूल केला नाही त्यांच्याबरोबर त्यांचे वरिष्ठ अधिकारी सुद्धा दोषी आहेत. त्यामुळे समितीने मागणी केल्याप्रमाणे विभागाकडून संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही कार्यवाही करण्यात यावी व विभागाने कार्यवाही न केल्याचे कारण सुद्धा समितीला सांगण्यात यावे. सन २०११-१२ ला करावयाची कार्यवाही विभाग आज सुरू करीत आहेत. संबंधितांनी कमी भरलेल्या कराची रक्कम विभागाने सन २०१२-१३ आणि २०१३-१४ मध्ये वसूल केली. मग त्यावरील दंडात्मक कारवाईची रक्कम विभागाने मागे का ठेवली, असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, हे प्रकरण साधे नसल्याने विभागास कार्यवाही करण्यास विलंब होत आहे. सध्या कार्यवाही सुरु आहे.

२.८ ज्यांनी वसुलीची कार्यवाही केली नाही त्यांच्यावर प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कारवाई करायला हवी होती. त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुद्धा त्यांच्यावर ४-४ वर्षे कारवाई केली नाही. त्यामुळे आता त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरच कारवाई केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले. महालेखाकार कार्यालयाने सन २०११ मध्ये परिच्छेद काढला असून आणि त्यानंतर दंडात्मक कार्यवाही करून संबंधितांकडून २०१२-१३ आणि २०१३-१४ मध्ये पैसे वसूल केले आहेत. आज सन २०१७ असून अधिकाऱ्यांवर कारवाई केली नाही. मात्र ती कार्यवाही आता सुरू

करणार असल्याचे विभागाचे म्हणणे आहे. परिवहन आयुक्त यांनी सांगितले की, नाशिकच्या बाबतीत विभागाने त्या अधिकाऱ्यांना प्रथम कारणे दाखवा नोटीस दिली आहे. त्यावर विभागाने ही नोटीस कधी दिली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, परिवहन आयुक्त यांनी त्यासंबंधीची कागदपत्रे आता उपलब्ध नसल्याने तारीख सांगता येणार नाही असे समितीस अवगत केले.

२.९ तसेच विभागीय सचिवांनी असेही सांगितले की, समितीने आदेश दिल्यानंतर विभागाला संबंधिताविरुद्ध कारवाई करावीच लागेल. कारण ही चूक उघड आहे. आयात केलेल्या गाडीला देशी बनावटीची सांगणे यामध्ये स्पष्टपणे नियमभंग आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना सहानुभूती दाखविण्याचे कारण नाही. परंतु ती सहानुभूती दाखविण्यात आली असल्याचे समितीने व्यक्त केले.

ज्या अधिकाऱ्यांनी ही कार्यवाही केली नाही ते अधिकारीदेखील यामध्ये दोषी आहेत.ज्यांनी हे पैसे चुकविण्यास मदत केली किंवा शासनाचा महसूल बुडविला ते तर दोषी आहेतच. पण त्यांना ज्यांनी वाचविले तेही अधिकारी दोषी आहेत. त्यांनाही वाचविता कामा नये. म्हणून समितीची सक्त ताकीद आहे की, ज्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणी कार्यवाही करायला हवी होती ती करण्यात आली नाही त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करून त्यासंबंधीचा अहवाल या समितीला ३ महिन्यात देण्यात यावा असे समितीने निदेश देऊनही समितीस माहिती प्राप्त झाली नाही हीबाब समितीने नमूद केली.

२.१० कोल्हापूर, नाशिक आणि ठाणे या तीन प्रादेशिक परिवहन कार्यालयांचा हा परिच्छेद आहे. त्यावर महालेखाकारांनी अहवालात आक्षेप घेतले म्हणून ते समितीला समजले. पण अशाच प्रकारे राज्याच्या विविध ठिकाणी असा टॅक्स न भरता काही गाड्या आल्या असतील तर त्यांची माहिती विभागाकडे उपलब्ध आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांकडून पुन्हा असे घडणार नाही असे सांगितले. तसेच भविष्यात या दृष्टीने कोणती उपाययोजना केली जाईल याबाबत सांगितले.आता आयात गाडयांवर एक रकमी कर वसूलीसंबंधीची संपूर्ण प्रक्रिया संगणकीकृत झालेली आहे असे परिवहन आयुक्तांनी समितीस सांगितले.पूर्वी ते मॅन्युअली होत असल्यामुळे त्यामध्ये कमी, अधिक वाहन कर वसूल करण्यास वाव होता. मात्र आता तसा वाव नाही. पूर्वी वाहन क्रमांक, मॉडेल आणि चेसीस नंबर लिहिला जात होता आणि इम्पोर्टेडला डोमॅस्टीक दाखविले जात होते. मात्र आता सर्व कारभार संगणकीकृत झालेला असल्यामुळे तसे करता येत नाही. कारण त्यामध्ये आता स्वतंत्र रकाना आहे आणि त्यामध्ये एकदा नॉट इम्पोर्टेड म्हटले की व्हेरीफाय केले जाते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.११ सन २०११-१२ नंतर ही यंत्रणा कोणत्या वर्षापासून सुरू झाली आहे आणि मध्यंतरीच्या काळात अशी काही प्रकरणे प्रलंबित आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अशा प्रकारची इतर प्रकरणे आढळून आली नाहीत व संगणकीकरणामुळे पुन्हा तशी प्रकरणे घडणार नाहीत. ज्या ५ लाख २० हजार रुपयांची वसुली शिल्लक होती त्याबद्दल विभागाचे म्हणणे काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, महालेखाकारांचा आक्षेप ९ गाड्यांच्या बाबतीत होता. त्यापैकी ८ गाड्या परदेशी होत्या. ९ वी बीएमडब्ल्यू गाडी ११ सीरीजची असून ती त्या वर्षापासून प्रथमच हरियाणा राज्यामध्ये निर्मिती झाली होती. ती नजरचुकीने झालेली नोंद होती. कारण यापूर्वी ती गाडी परदेशी गाड्यांच्या यादीमध्ये होती. आता ती देशांतर्गत झाली असल्यामुळे विभागाला परदेशी गाडयांसाठी लागू असलेला ५ लाख रुपयाचा कर वसूल करता येत नाही. त्यामुळे आता विभागाकडे कोणत्याही वाहनांची कर वसुली प्रलंबित नाही असे विभागाचे म्हणणे आहे. हा परिच्छेद महालेखाकार कार्यालयाकडून विभागाने तपासून घेतला असून महालेखाकार कार्यालयाने ते मान्य केलेले आहे.

जोपर्यंत एखादा विषय महालेखाकारांकडे जात नाही आणि त्यांच्याकडून आक्षेप येऊन साक्ष ठेवली जात नाही तोपर्यंत हे परिच्छेद प्रलंबित ठेवण्यात येतात. ज्या अधिकाऱ्यांची वसुलीची कार्यवाही करण्याची जबाबदारी होती आणि त्यांनी ती कार्यवाही केली नसल्यामुळे त्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरणार आहात की प्रत्येक बाबीची साक्ष लागल्यानंतर कार्यवाही करणार आहात? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, या प्रकरणी कार्यवाही करण्यात येईल विलंब झाल्याचे विभागाने मान्य केले. विभागाने ३ महिन्यात कार्यवाही करून त्यानुसार ३ महिन्याच्या आत कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

२.१२ तीन जिल्ह्यांव्यतिरिक्त इतर जिल्ह्यांमध्ये ज्या गाड्या आयात झाल्या आहेत त्यांचा आकडा विभागाकडे उपलब्ध आहे काय, कारण लेखापरीक्षण आक्षेपानंतर ज्यांची माहिती मिळाली त्यांच्याशिवाय ज्या गाड्या आयात झाल्या आहेत त्यांची माहिती समितीला हवी आहे. जेएनपीटीमध्ये ५ वर्षापूर्वी जवळ जवळ ३०० मोटर सायकली आयात झाल्या आणि काही गाड्या सुद्धा आयात झाल्या. त्या पेण आरटीओ कार्यालयात रजिस्टर झाल्या.हा फार मोठा घोटाळा होता. त्यामध्ये आयात कर संपूर्णपणे चुकविला होता. ज्यांनी या गाड्या नोंदविल्या होत्या त्याची चौकशी करण्यात आली होती. सभागृहामध्ये सुद्धा चर्चा झाली होती. त्यांची संपूर्ण वसूली झाली आहे काय? हा विषय येथे नाही. पण या बाबतीत शासनाचा करोडो रुपयांचा कर बुडविला होता आणि जवळ जवळ २५ आरटीओ ऑफिसर त्यावेळी निलंबित केले होते. त्यामुळे या ३ जिल्ह्यांव्यतिरिक्त राज्याच्या इतर जिल्ह्यांमध्ये किती गाड्या आयात झाल्या आहेत आणि त्यांची वसुली झाली आहे काय, कारण महालेखाकार

यांनी राज्यातील फक्त २-४ जिल्ह्यांचे नमुना लेखापरीक्षण करीत असतात. इतर जिल्ह्यांची विभागाकडे आकडेवारी आहे काय आणि असल्यास त्यांनी अशी संपूर्ण वसुली केली आहे काय, कारण फक्त ३ जिल्ह्यांमध्येच लेखापरीक्षण परिच्छेदानंतर इतकी वसुली करावयाचे निष्पन्न झाले आणि त्यानंतर विभागाने ती वसुली केली. पण त्या पलिकडे सुद्धा इतर जिल्ह्यांची विभागाने या नमुना लेखापरीक्षणाप्रमाणे सखोल चौकशी करून माहिती घेणे आवश्यक आहे. सदर वसूलीसाठी विभागाने काय कार्यवाही केली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, आता विभागाकडे वसुलीबाबतचे आकडे उपलब्ध नाहीत. मात्र याबाबतची आकडेवारी उपलब्ध आहे की, राज्यामध्ये एकूण किती गाड्या आयात करण्यात आल्या आहेत आणि त्यांच्याकडून विभागाने किती मोटर वाहन कर वसूल केला आहे. समितीला त्या आकडेवारीमध्ये स्वारस्य नसून राज्यामध्ये ज्या एकूण आयात केलेल्या गाड्या आहेत त्यांच्या बाबतीत कर वसुली पूर्णपणे झाली आहे किंवा नाही. हा लेखापरीक्षणाचा परिच्छेद आला म्हणून त्यासंबंधी वसुली करून घेतली. जी वसुली करणे योग्य नाही त्या बाबतीत निष्पन्न केले की, ती वसुली करता येणार नाही. मात्र तशाच प्रकारे संपूर्ण राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये आयात करण्यात आलेल्या गाड्यांची सखोल चौकशी विभागाने केलेली आहे काय आणि त्यानुसार येणारा कर विभागाने वसूल केला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, लेखापरीक्षण केलेले नाही. परंतु विभाग पुन्हा राज्यातील एकूण आयात केलेल्या गाड्यांचा आढावा घेऊन त्यांची संख्या किती आहे ते पुन्हा पृष्ठी करून घेण्यात येईल अशा प्रकारच्या दुसऱ्या केसेस आहेत किंवा नाहीत. या बाबतची कार्यवाही विभागाकडून एका महिन्याच्या आत करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

२.१३ ज्या गाड्या आयात झाल्या ते तपासण्याचे काम विभागाला इंटरनेटवरुन करता येईल. देशामध्ये जेवढी २२-२३ बंदरे आहेत, या बंदरांकडून विभागाने माहिती गोळा केली तर राज्याला करोडो रुपयांचा कर मिळेल. या निमित्ताने विभागाने ती माहिती गोळा करावी, असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवून समितीला एक महिन्याच्या आत ती माहिती गोळा करून समितीला सादर करण्यात येईल असे समितीस आश्वस्त केले.

२.१४ आयात गाडी दाखविण्याऐवजी ती जुनी गाडी आहे असे दाखवून रजिस्ट्रेशन करून घ्यायचे असे अनेक प्रकार होऊ शकतात. विभाग जोपर्यंत आपली यंत्रणा अद्ययावत करीत नाही तोपर्यंतच्या कराची वसुली झाली किंवा नाही याची माहिती विभागास मिळणार नाही. आयात गाडयांच्या संदर्भात विभागाने सखोल चौकशी करून एका महिन्यामध्ये समितीला माहिती द्यावी असे समितीने सूचित केले. विभागाने ही यंत्रणा सक्षम केली तर पुढील काळात विभागाला कर वसूलीचे काम आणखी सोपे जाईल. प्रादेशिक परिवहन विभाग किंवा परिवहन विभागाच्या सचिवांनी बंदरांना असे कळविणे आवश्यक आहे की, प्रादेशिक परिवहन विभागाच्या मंजूरीशिवाय आयात गाड्यांना मंजूरी देऊ नये. उदाहरण द्यायचे झाले तर एखादा माल परदेशातून येतो तेव्हा संबंधित विभागाकडून सदर माल आपल्या देशामध्ये आयात करण्यासाठी कोणती बंदी वगैरे नाही किंवा त्यावर असे निर्बंध आहेत हे तपासले जाते व त्यासंबंधी ना हरकत प्रमाणपत्र लागते. त्यामुळे तशाच पद्धतीने प्रादेशिक परिवहन विभागाने जर कस्टमला आणि बंदर अधिकाऱ्यांना पत्र पाठविले तर राज्यात टू-व्हीलर, थ्री व्हीलर, व्हेईकल्स किंवा व्हेईकल्स टाईप कोणतीही मशिनरी आली तर प्रादेशिक परिवहन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्रानंतर त्यांचे क्लिअरन्स द्यावे. विभागाकडून सदरचे ना हरकत प्रमाणपत्र २४ तासाच्या आत देण्यात यावे. त्यामुळे राज्यात आयात गाड्यांचे कर सुरूवातीलाच प्राप्त होतील असे समितीने सूचित केले असता, वाहन कर तेव्हा लावला जातो जेव्हा ती गाडी रजिस्टर होते. ज्या गाड्या पोर्टमधून येतात त्या संपूर्ण गाड्या महाराष्ट्रात नोंदविल्या जात नाहीत.त काही गाड्या इतर राज्यात नोंदविल्या जातात.त त्यामुळे विभागाला कर घेण्याचा अधिकार तेव्हा असतो जेव्हा गाडीची नोंदणी होते. त्याचप्रमाणे त्यामध्ये २-३ ऑपरेशनल मुद्दे आहेत.त पहिला मुद्दा म्हणजे महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर राज्यांसाठी आपल्या बंदरांमध्ये गाड्या आयात होतात. दुसरा मुद्दा म्हणजे तो व्यक्ती त्याची गाडी कोणत्या राज्यात नोंदवितो. कारण हा त्या राज्यांचा कर असतो. त्या त्या कंपन्यांचे स्पेसिफिक डिलर्स असतात. कधी कधी सब डिलर्स जरी असले तरी मुख्य डिलर्सकडूनच ती गाडी त्याच्याकडे जाते. डायरेक्ट गाडी आयात करायचे लायसन्स कोणालाही नाही. त्यामुळे विभाग त्या डिलर्सवर ते बंधन घालू शकतो की, प्रादेशिक परिवहन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय त्या गाडीचा कोणताही पार्ट आपण बाहेर पडू देऊ नये. संबंधित व्यक्तीच्या नावावर गाडी करायची असेल तर परिवहन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.१५ मुंबई शहरामध्ये तीन तालुके आहेत. ते म्हणजे कुर्ला, अंधेरी, बोरीवली. गाव पातळीवर एखादा तालुका जवळच्या अंतरावर असू शकेल. कारण त्या ठिकाणी लोकसंख्या कमी असते. त्यामुळे तो तालुका प्रादेशिक परिवहन कार्यालय म्हणून ओळखला जातो. एक प्रादेशिक परिवहन कार्यालय दहिसरला कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू आहे. चारकोप येथे असलेल्या कार्यालयाचे नाव प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली असे ठेवले आहे. तालुका बोरीवली आहे म्हणून त्याचे नाव बोरीवली ठेवले आहे. पण यामधून लोकं गोंधळून जातात. त्यामुळे शासनाने यासंबंधी निश्चित कार्यपद्धती करण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरामध्ये ज्या भागामध्ये जो पिन कोड नंबर लागतो त्यानुसार त्या प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे नाव ठेवले पाहिजे असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

२.१६ पूर्वी ज्याप्रमाणे कार किंवा व्हेईकल्स शहरामध्ये नोंदविताना जास्त टॅक्स लागत असल्यामुळे त्या ग्रामपंचायतीमध्ये नोंदवित होते. आता जीएसटी आल्यामुळे हे सर्व प्रकार बंद झाले आहेत. बोरीवली आरटीओ कार्यालयाच्या फ्लाईंग स्कॉडची संख्या अतिशय कमी आहे. फ्लाईंग स्कॉडच्या संख्येमध्ये वाढ करण्यात आली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता फ्लाईंग स्कॉड कार्यरत आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. फ्लाईंग स्कॉडची संख्या केवळ ३ आहे. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता मुंबई मध्ये ७ फ्लाईंग स्कॉड आहेत. असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. मुंबई उप नगरामध्ये फ्लाईंग स्कॉडची संख्या किती आहे? अशी विचारणा समितीने केली असता, परिवहन आयुक्त यांनी मुंबई शहर व उप नगर याकरिता फ्लाईंग स्कॉडची संख्या ७ असल्याचे सांगितले. परंतु सदर संख्या कमी असल्याने त्यामध्ये वाढ करण्यात यावी, असे समितीने सूचित केले. त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, फ्लाईंग स्कॉडची संख्या कमी करता येईल, ती वाढविण्याचे काही कारण नाही. जनतेला त्याचा त्रास होईल.

२.१७ मुंबई, ठाणे या भागातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरण्यात येतात परंतू विदर्भातील अनेक पदे रिक्त आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शासनाच्या निकषानुसार अगोदर विदर्भ, मराठवाडा अशा प्रकारे रिक्त पदांची भरती करण्यात येते. विदर्भामध्ये रिक्त पदे नाहीत, असे विभागाचे म्हणणे आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, रिक्त पदे आहेत. परंतु रिक्त पदांची विभागणी करण्यात आली आहे.

२.१८ अभिप्राय :

मुंबई मोटार वाहन कर अधिनियम १९५८ नुसार भारतात आयात करून राज्यात वापरावयाच्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या मोटार गाडयांवर आकारावयाचा एक रकमी कर देशांतर्गत वाहनांसाठी लागू होणाऱ्या दराच्या दुप्पट असताना प्रादेशिक परिवहन कार्यालय कोल्हापूर, नाशिक व ठाणे यांनी आयात वाहनांवरील एकरकमी कराची (OTT) कमी आकारणी केली. परिणामी, रु. १६.६१ लाखाचा कर कमी वसूल केला गेला. तसेच यावर विहित दराने व्याज देखील आकारणीय होते.

यासंदर्भात साक्षीदरम्यान हे आक्षेप मान्य केले. परंतु ९ गाडया पैकी ८ गाडयांच्या आयात एकरकमी कराची वसूली केली असून ९ वी बीएमडब्ल्यू गाडी ही आयात केलेली नसल्यामुळे व ती देशांतर्गत बनलेली असल्यामुळे भरलेला एक रकमी कर योग्य होता असे सांगण्यात आले.

या परिच्छेदातील आक्षेपातील संपूर्ण वसूली झालेली आहे. परंतु या सर्व बाबी तपासून नियमानुसार कराची आकारणी करण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांची होती त्यांनी ती पार पाडली नाही. त्यामुळे सकृतदर्शनी या प्रकरणी अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा सिद्धच होतो. एवढेच नव्हे तर यात अधिकाऱ्यांची हातमिळवणी अथवा संगनमत असल्याची देखील शक्यता नाकारता येत नाही. साक्षी दरम्यान विभागाचे प्रतिनिधी ही चूक मान्य करतात. परंतु समितीची साक्ष लागेपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही जबाबदारी निश्चित करून विभाग त्यांचेवर कारवाई करीत नाही ही देखील गंभीर बाब आहे. वास्तविक विभागीय सचिवांनी सर्व संबंधितांवर कारवाई करुनच समितीसमोर येणे आवश्यक होते. परंतु, विभागाने या गंभीर प्रकरणाची दखल समितीची साक्ष लागल्यानंतर घेतली.

जर या गंभीर बाब निदर्शनास आल्या तर त्यावेळी एकरकमी कर भरण्यासाठी संगणकीकृत प्रणाली नसल्यामुळे वाहन आयात केले असले तरी त्याची नोंदणी देशांतर्गत करून कर चुकविण्याची कार्यवाही निष्काळजीपणा अथवा संगनमत करून अधिकाऱ्यांकडून करणे सहज शक्य होते. परंतु, महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदवेपर्यंत या गंभीर बाबींकडे विभागाने लक्ष देऊ नये अथवा त्यांच्या निदर्शनास येऊ नये हे विभागांतर्गत नियंत्रणाचा अभाव दर्शविणाऱ्या बाबी आहेत. महालेखाकारांनी नमुन्यादाखल केवळ ३ जिल्ह्यांचे लेखापरिक्षण केले असून त्यात राज्यातील सर्व जिल्ह्याच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयातील आयात वाहनावरील एकरकमी कर अचूक भरणा केला असल्यासंदर्भातील नस्त्याचे विशेष पथकामार्फत संगणकीकृत प्रणाली लागू होण्यापूर्वीच्या काळापर्यंतची तपासणी करणे आवश्यक आहे. ५ वर्षे अगोदरदेखील जेएनपीटीमध्ये ३०० मोटार सायकली अशाचप्रकारे कर चुकवून आणण्यात आल्या असता मोठा गैरव्यवहार उघडकीस आला व त्यात २५ आरटीओ अधिकारी निलंबित झाले असल्याचे समितीच्या निदर्शनास आणण्यात आले. तरीही अशा प्रकरणांची अद्यापही पुनरावृत्ती होते ही गंभीर बाब आहे. यात मोठे रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. विभागाने हे मान्य देखील केले व यासंदर्भातील तपासणी करण्याचे व १ महिन्याच्या आत समितीला माहिती सादर करण्याचे आश्वासित केले. अशा बाबींची विभागाने स्वत:हून दखल घेण्याची व कारवाई करण्याची गरज होती. परंतु, महालेखाकारांनी यासंदर्भात आक्षेप नोंदवेपर्यंत या अनियमितता विभागाच्या लक्षात देखील येऊ नये ही देखील गंभीर बाब आहे. तसेच सदरहू प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून ३ महिन्यात कारवाई करण्याचे समितीला आश्वासित करण्यात आले. परंतु अद्यापही याबाबतची माहिती समितीला अप्राप्त आहे.

२.१९ शिफारशी :

(१) कोल्हापूर, नाशिक व ठाणे येथील प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी व उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी आयात केलेल्या ८ गाडयांना नियमानुसार एक रकमी आयात कर लावणे आवश्यक असताना देशांतर्गत एक रकमी कराची चुकीची व कमी आकारणी करण्यात आली. महालेखाकारांनी घेतलेले सदरहू आक्षेप विभागाने साक्षी दरम्यान मान्य केले व पूर्ण वसुलीही केली. परंतु संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली नाही. महालेखाकारांनी सदरहू आक्षेप सन २०११-१२ या आर्थिक वर्षात नोंदविलेले असताना विभागाने या गंभीर आक्षेपांची साधी दखलही घेतली नाही व जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली नाही. व आता समितीसमोर हे आक्षेप विभाग मान्य करतो ही बाब योग्य नसून याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. समितीने यासंदर्भात गंभीर नोंद घेतली असता यास विलंब झाल्याचे मान्य करण्यात आले व दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले. परंतु अद्यापही ही माहिती समितीला अप्राप्त आहे. अतः अशाप्रकारे कराची सदोष आकारणी करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच हे आक्षेप महालेखाकारांनी लक्षात आणून देऊनही विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यासंदर्भात समितीच्या बैठका लागेपर्यंत ४-४ वर्षे कारवाई केली नाही. त्यामुळे दोषींवर कारवाई न करणाऱ्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांवर सुद्धा कारवाई करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२० (२) महालेखाकारांनी नमुन्यादाखल फक्त ३ जिल्ह्यांचे लेखापरीक्षण केले आहे. व त्यात या गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत. महालेखाकारांच्या लेखापरीक्षणानंतर विभागाने कर वसुलीची कार्यवाही केली आहे. परंतु या बाबी राज्यात अन्य ठिकाणी देखील घडलेल्या असल्याची पूर्ण शक्यता आहे. त्यामुळे विभागाने राज्यातील उर्वरित जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन विभागात संगणकीकृत प्रणाली लागू होण्यापूर्वीच्या काळापर्यंत आयात केलेल्या व नोंदणी झालेल्या परदेशी बनावटीच्या गाड्यांच्या कर वसुलीची विशेष पथकामार्फत तपासणी करण्यात यावी व अशाच अनियमितता त्यात निदर्शनास आल्यास वसुलीची कारवाई करण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२१ (३) आता विभागाने यासंदर्भात संगणकीय प्रणालीचा अवलंब केलेला असल्यामुळे या बाबींची पुनरावृत्ती टाळता येणे शक्य आहे. तरीही देशामध्ये २२ ते २३ बंदरे आहेत. या गाड्या पोर्टमधून येतात त्यामुळे त्यांचेशी विभागाने समन्वय ठेवल्यास आयात करण्यात आलेल्या गाड्या व राज्यात नोंदणी करण्यात आलेल्या गाड्या यामधील तफावती शोधणे विभागाला सहज शक्य होईल. अतः या अनुषंगाने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व भविष्यात या बाबींची पुनरावृत्ती टाळावी अशी समितीची शिफारस आहे.

गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-१२ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ५.६.१ " चुकीचा लोकसंख्येचा स्तर लागू करण्यामुळे अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

३.२ परिच्छेद क्र. ५.६.१ चुकीचा लोकसंख्येचा स्तर लागू करण्यामुळे अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली :

The Maharashtra Potable Liquor (MPL) (Periodicity and Fees for Grant, Renewal or Continuance of Licences) (PFGRC) Rules, १९९६ नियमांच्या तरतुदीन्वये अनुज्ञप्ती शुल्काचे दर हे राज्य उत्पादन शुल्क आयुक्तांकडून विविध अनुज्ञप्तीकरिता सदर नियमांतील नियम ४ च्या कलम (i) अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करून दरवर्षी अधिसूचित केले जातात. अनुज्ञप्तींकरिता देय शुल्क हे मद्य विक्री दुकाने असलेले शहर, नगर वा गावाच्या लोकसंख्येच्या स्तरावर आधारित असते.

(ii) २००१ च्या जनगणनेनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या (KDMC) अखत्यारीत असलेली लोकसंख्या ११,९३,५१२ होती. २००२ मध्ये ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अधिसूचनेनुसार, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (KDMC) तून २७ गावे वगळली होती. २००१ च्या जनगणनेनुसार या गावांची १,४६,२१५ इतकी लोकसंख्या तहसीलदार, कल्याण यांनी सुनिश्चित केली होती.

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (SSE), ठाणे यांच्या अनुज्ञप्ती नुतनीकरण नोंदवहीच्या, सप्टेंबर,२०१० मध्ये केलेल्या, छाननी दरम्यान आम्हांस असे आढळले की, २७ गावे वगळल्यावर २००१ च्या जनगणनेनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (KDMC) ची लोकसंख्येचा स्तर १० लाखांपेक्षा अधिक असूनही,१३८ अनुज्ञप्तीधारकांच्या (FL II, FL III आणि CL III. CL/FL/TOD-II FL/BR-II) बाबतीत २०१०-११ या वर्षाकरिता अनुज्ञप्ती शुल्क हे १० लाखांपेक्षा कमी लोकसंख्येसाठी असलेल्या दराने वसूल केले गेले. यामुळे रुपये १.१० कोटी अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली झाली.

(ii) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (SSE), पुणे यांच्या अनुज्ञप्ती नुतनीकरण नोंदवहीच्या, फेब्रुवारी, २०१२ मध्ये केलेल्या, छाननी दरम्यान आमच्या निदर्शनास आले की, FL-BR-II परवाने असलेल्या चार परवानाधारकांनी, २००९-१० ते २०११-१२ दरम्यान विविध कालावधीत नुतनीकरण केलेल्या परवान्यांकरिता त्यांच्या भागातील लोकसंख्येच्या कमी स्तरासाठी विहित असलेले अनुज्ञप्ती शुल्क भरले होते. एकंदर रुपये ७.६२ लाख अनुज्ञप्ती शुल्का ऐवजी केवळ रुपये २.०३ लाख शुल्क भरले होते. यामुळे रुपये ५.५९ लाखांचे अनुज्ञप्ती शुल्क कमी वसूल झाले.

आम्ही ही प्रकरणे कळविल्यावर अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (SSE), ठाणे यांनी निरीक्षणे मान्य करून नमूद केले की, मागणी सूचना जारी करून तफावतीच्या रकमेची वसुली करण्यात येईल. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (SSE), पुणे यांनी नमूद केले की, पडताळणीनंतर वसुलीची कार्यवाही केली जाईल. वसुलीचा अहवाल प्रतिक्षाधीन आहे.

या बाबी आम्ही शासनाच्या निदर्शनास जून, २०१२ मध्ये आणल्या, त्यांचे उत्तर प्रतिक्षाधीन आहे (जानेवारी, २०१३).

३.३ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे यांच्या अभिलेखाच्या पडताळणीमध्ये निदर्शनास आले की, सन २००१ च्या जनगणनेनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची लोकसंख्या दहा लाखापेक्षा जास्त असताना देखील सन २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीत अनुज्ञप्ती मंजुरीसाठी/नूतनीकरणासाठी तीन लाख ते दहा लाख लोकसंख्येच्या टप्प्याकरिता लागू असलेले अनुज्ञप्ती शुल्क वसूल न केल्यामुळे थकबाकी दर्शविण्यात आलेली आहे. सदर थकबाकी सन २००१ ते २००४ च्या कालावधीत अनुज्ञप्ती शुल्क वसूल करताना सन २००१ च्या जनगणनेनुसार वसुली करण्यात आलेली असून सदर महानगरपालिकेतून २७ गावे वगळण्यात आल्यामुळे दहा लाखापेक्षा कमी लोकसंख्या झाली. त्यामुळे नियमानुसार आक्षेपित दर्शविण्यात आलेली रक्कम वसुलपात्र नाही या विषयी दिनांक ३०/०१/२०१३ रोजी पार पडलेल्या लोकलेखा समितीच्या बैठकीमध्ये समितीने विभागाचे वरीलप्रमाणे म्हणणे मान्य केलेले आहे. तरी सदर आक्षेप वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

महालेखाकार कार्यालय, मुंबई यांच्या अंतर्गत लेखा निरीक्षण पथकाने अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे यांच्या कार्यालयाच्या लेख्याचे निरीक्षण केले असता त्यांनी ४ एफएल-बी-आर-२ अनुज्ञप्त्यांबाबत रुपये ५,५९,२७५ रक्कम कमी वसुलीबाबत आक्षेप नोंदविलेला आहे.सदरच्या आक्षेपाची माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे. एकूण ४ पैकी १अनुज्ञप्ती ही पुणे महानगरपालिका क्षेत्रात येत नसून खडकी कॅन्टोनमेंट बोर्ड क्षेत्रात येत आहे. सदर प्रकरणी याबाबत कॅन्टोनमेन्ट बोर्डाच्या हद्दीतील असलेल्या अनुज्ञप्तीधारकाकडून मार्गदर्शक तत्व आहे तरी या विरुद्ध कॅन्टोनमेन्ट क्षेत्रातील अनुज्ञप्तीधारकांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक ५०५१/२००४ दाखल केली असता अशा प्रकारे अनुज्ञप्ती शुल्क वसुलीस मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे.

उर्वरित ३ अनुज्ञप्त्या या पुणे महानगरपालिका हद्दीत येत नसून स्वतंत्रपणे असलेल्या ग्रामपंचायत हद्दीत येतात. सदर प्रकरणी सन २००१ च्या जनगणनेनुसार असलेल्या लोकसंख्येबाबत सदरच्या ग्रामपंचायतीचे दाखले सादर केले आहेत. सदरच्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या अनुज्ञप्तीधारकाकडून शासनाने विहित केलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्क वसूल केलेले आहे.

त्यामुळे अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे यांच्या अधिनस्त असलेल्या ४ ही अनुज्ञप्तीधारकाकडून अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्काची वसुली झालेली नाही. एकूण रु. ५,५९,२७५ कमील वसुली बाबत महालेखापालांनी नोंदविण्यात आलेला आक्षेप चुकीच्या गृहीतकांवर आधारित असल्याने सदरचा आक्षेप बंद करण्यात यावा.

साक्ष :

३.४ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

परिच्छेद क्र. ५.६.१ " चुकीच्या लोकसंख्येचा स्तर लागू करण्यामुळे अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली " :

३.५ उपरोक्त परिच्छेद क्र. ५.६.१ " चुकीच्या लोकसंख्येचा स्तर लागू करण्यामुळे अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुलीच्या " संदर्भात चर्चा करताना महालेखाकारांनी असे निदर्शनास आणले की, राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत दारु विक्रीसाठी विविध प्रकारचे परवाने देण्यात येतात. या परवान्यांच्या विविध (विभाग) कॅटॅगरी आहेत. देशी व विदेशी दारुच्या विक्रीसाठी वेगळे परवाने असतात. त्यांना सी.एल.१, २, ३ व एफ.एल.१, २, ३ असे संबोधले जाते. शहरामध्ये किंवा ज्या भागामध्ये दारुची दुकाने आहेत तेथे जनगणनेनुसार असलेल्या लोकसंख्येवर परवान्यांचे दर ठरविले जातात. त्या काळी १० लाखांपर्यंतचा व त्यापुढचा असे टप्पे होते. सी.एल.३ साठी १० लाखांपर्यंत लोकसंख्या असेल तर ८० हजार एवढी व १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असेल तर हे दर १ लाख १२ हजार आठशे रुपये एवढे होते. हे दर वार्षिक असतात. विदेशी दारुसाठी १ ते १० लाख लोकसंख्या असेल तर दर अडीच लाख रुपये होते व १० लाख रुपयांच्या पुढे ४ लाख २० हजार रुपये एवढे दर होते. साधारणपणे उत्पादन शुल्क विभाग जनगणनेनुसार जी लोकसंख्या असते त्याप्रमाणे they are bound by that and they go by those figures for determining the licence fee. २००१ च्या लोकसंख्येची आकडेवारी सन २००२-०३ पर्यंत आली असावी. महालेखाकार कार्यालयाचे ऑडिट (लेखापरीक्षण) सन २०१० व २०१२ या वर्षाचे आहे. यामध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील प्रकरण आहे. जनगणनेप्रमाणे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची ११ लाख ९३ हजार ५१२ एवढी लोकसंख्या होती. त्यानंतर सन २००२ मध्ये २७ गावे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमधून वगळली गेली. या २७ गावांची लोकसंख्या केवळ १ लाख ४६ हजार २१५ एवढी होती. जरी या गावांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येमधून वजा केली तरीही कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची लोकसंख्या १० लाखांपेक्षा जास्तच होती. परंतु या स्लॅबप्रमाणे वसुली झाली नाही. यामध्ये कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीमधील १३८ प्रकरणे व पुणे येथील प्रकरणांचा समावेश आहे.

३.६ महालेखाकारांनी निदर्शनास आणलेल्या माहितीनुसार याबाबतची सद्य:स्थिती काय आहे? तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची लोकसंख्या १० लाखांपेक्षा कमी असल्याबाबत विभागाने सांगितले असून समितीला तहसीलदार, कल्याण यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार १० लाख ४७ हजार २९७ एवढी लोकसंख्या आहे याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्यावेळी परवान्यांचे नुतनीकरण केले होते त्यावेळी ११ लाख एवढी लोकसंख्या होती. २७ गावांची नेमकी लोकसंख्या त्यावेळी विभागाकडे नव्हती. तहसीलदाराने दिलेली ही आकडेवारी अनुमानित असून, गावांनुसार किंवा वॉर्डनुसार जनगणना दिली जात नाही केवळ जिल्ह्याची लोकसंख्या दिली जाते.

३.७ ही आकडेवारी अनुमानित आहे हे विभागाकडून कसे सांगण्यात येते कारण याबाबत समितीकडे प्रमाणपत्र असल्याचे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी नमूद केले की, ही जनगणना करताना गावांनुसार किंवा वॉर्डनुसार लोकसंख्या दिली जात नाही.

गावानुसार जनगणना नसते असे विभागाकडून सांगण्यात आले. तथापि, प्रत्येक गावानुसार लोकसंख्येची गणना झाल्याशिवाय ग्रामपंचायतीची स्थापनाच होत नसल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले असता, तहसिलदारांनी वॉर्डनुसार लोकसंख्या काढून समितीस दिली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.८ " कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या २७ गावांची लोकसंख्या " असे प्रमाणपत्र समितीकडे आहे. This cetificate was given to State Excise Department. विभागाला हे प्रमाणपत्र दिले व त्या प्रमाणपत्राच्या आधारेच महालेखाकारांचे म्हणणे आहे की, विभागाकडून वसुली का होत नाही? दिनांक १३ मार्च, २००७ रोजीचे पत्र आहे त्या पत्राच्या अनुषंगाने निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना पत्र देण्यात आलेले आहे. जर तहसिलदार कार्यालय लोकसंख्या एवढी आहे असे म्हणत असतील तर विभागाचे देखील तसेच म्हणणे असले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

३.९ जानेवारी, २०१३ मध्ये तत्कालीन लोकलेखा समितीची बैठक झाली. त्यावेळी या विषयावर चर्चा झाली असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले असता तत्कालीन लोकलेखा समितीला बैठकीत सांगितले होते की, या २७ गावांची लोकसंख्या निश्चित नाही. परंतु आता समितीसमोर कागदपत्रे आलेली आहेत व त्या अनुषंगाने समितीला असे दिसून येते की, विभागाला माहिती असतानादेखील, म्हणजेच निरीक्षक, उत्पादन शुल्क यांच्याकडे पत्र आले म्हणजेच आयुक्त, उत्पादन शुल्क यांच्याकडे आले व आयुक्तांकडे माहिती पोहोचली म्हणजे विभागाला पोहोचली असा त्याचा अर्थ आहे. विभागाकडे हा अधिकृत कागदपत्रे आल्यानंतर यामध्ये असे करण्याचे काही कारण नसून Why we should plead for them? यामध्ये आता वसुली करण्यात काही अडचण आहे का? अशी विचारणा समितीने केली असता वसुली करण्यात काही अडचण नसल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

३.१० त्यावेळी वसुली का केली नाही व याबाबत विभागाची काय धारणा आहे? अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक ३० जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या साक्षीमध्ये तत्कालीन आयुक्त व सचिवांनी याबाबत माहिती दिली व तत्कालीन लोकलेखा समितीने ते कन्डोन केले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कोणतीही लोकलेखा समिती कोणत्याही परिस्थितीमध्ये देय पैसे कन्डोन करा किंवा सोडून द्या असे कधीही सांगणार नाही व विभागाला देखील ते क्षमापित करता येत नाही. असे समितीने अवगत केले असता, विभागाला वसुली करायला काही अडचण नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

३.११ समितीला तहसीलदारांकडून साक्षांकित केलेले प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. त्यामुळे विभागाने संबंधित १३२ परवानाधारकांकडून रकमेची वसुली करावी, ही समितीची धारणा असल्याचे नमूद केले. तसेच २७ गावे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमधून बाहेर गेल्यामुळे महापालिका १० लाखांपेक्षा खाली लोकसंख्या असलेल्या स्लॅबमध्ये आली हे परवानाधारकांनी अर्ज केल्यानंतर याबाबत कार्यवाही झाली की विभागाने स्वतःच केली. महापालिकेची लोकसंख्या १० लाखांपेक्षा खाली आली हे कोणाच्या विनंतीवरुन केले आहे किंवा विभागाने स्वतःच हे केले आहे याबाबत माहिती द्यावी व परवानाधारकांनी त्यावेळी तशी मागणी केली होती का? अशी विचारणाही समितीने केली असता, काही परवानाधारकांनी अर्ज केला असल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येत असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

जनगणनेची लोकसंख्या अनुमानित असल्याचा उल्लेख विभागीय सचिवांनी केला आहे. जर जनगणना करणाऱ्यांची आकडेवारी अनुमानित असेल तर विभाग जनगणना करतो किंवा यांच्याकडे नेमकी आकडेवारी आहे का? असा प्रश्न समितीने उपस्थित केला तसेच सचिवांच्या म्हणण्याप्रमाणे ही आकडेवारी अनुमानित असेललतर बरोबर लोकसंख्येच्या आकडेवारीसाठी विभागाची स्वतःची काही व्यवस्था आहे का? जर तसे नसेल व १० लाखांच्या वर लोकसंख्या असेल तर केवळ परवानाधारकांनी अर्ज केला म्हणून त्यांच्या फायद्यासाठी हे करण्यात आले, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, २७ गावांची जनगणना कशी काढली याबाबत विभागाला माहिती नाही. कारण जनगणना ही जिल्हानिहाय किंवा महापालिकानिहाय येते.

३.१२ विभागाने ही आकडेवारी अनुमानित आहे असे सांगितले असे समितीने पुनः निदर्शनास आणले असता, वॉर्डची आकडेवारी तहसीलदार कार्यालयाने कशी काढली, ती अनुमानित असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

वॉर्ड हा गावातीलच असतो, तो वेगळा नसतो गावाची जनगणना झाली म्हणजे वॉर्डची जनगणना झाली. ही आकडेवारी अनुमानित आहे हा निष्कर्ष विभागीय सचिवांनी काढला कशावरुन? जर जनगणना करणाऱ्यांची आकडेवारी अनुमानित आहे तर विभागाकडे अशी यंत्रणा आहे का, की ज्यामार्फत जनगणना करून विभाग त्याप्रमाणे उत्पादन शुल्क आकारतो? तसेच महापालिका क्षेत्रामधून ग्रामीण भागामध्ये आल्यानंतर परवानाधारकांची फीस कमी होते का अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर देऊन ३ ते १० लाखांचा एक व तीन लाखांच्या खाली असे वेगवेगळे स्तर असल्याचे समितीस अवगत केले.

३.१३ या २७ गावांची फीस पहिल्यांदा जास्त असेल व नंतर ग्रामीण भागामध्ये गेल्यामुळे ती कमी झाली असेल. २७ गावांचा हा मुद्दा नसून ही दुकाने २७ गावांमधील नसून कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीतील आहेत. मग लोकसंख्या १० लाखांपेक्षा कमी झाल्यामुळे काय फरक पडला? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांची परवाना फीस कमी होते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने तहसीलदाराच्या अहवालाला अनुमानित घेतले हे चुकीचे असून हे सर्व परवानाधारकांच्या विनंतीवर सुमोटो करण्यात आले हीदेखील विभागाची चूक असल्याचे समितीने नमूद केले. तसेचच दिनांक ३० जानेवारी, २०१३ रोजीच्या लोकलेखा समितीच्या बैठकीच्या अनुषंगाने विभाग काही प्रोटेक्शन घेत असेल तर कोणत्याही लोकलेखा समितीला चूक झालेली क्षमापित करण्याचा अधिकार आहे, परंतु अशा प्रकारे पैसे वसूल करु नका हे कोणतीही लोकलेखा समिती सांगणार नाही. जर १० लाखांच्या वर किंवा कमी लोकसंख्या असेल तर त्याला लागू असणारा स्लॅब लावण्यात यावा. तहसीलदारांनी दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे १० लाख ४७ हजार एवढी लोकसंख्या आहे. जनगणनेची आकडेवारी संकेतस्थळावर उपलब्ध असून याबाबत कोणाला विचारण्याचीही गरज नाही. यादृष्टीने हे सर्व पैसे किती दिवसात वसूल करणार व या सर्व चुका करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणार का? अशी विचारणा समितीने केली असता, वसुलीबाबतची कार्यवाही तात्काळ सुरू करण्यात येणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

३.१४ ही चूक असून कोणतीही शहानिशा न करता लोकसंख्या कमी गृहीत धरून १० लाखांच्या खाली आणायची व १३२ परवानाधारकांकडून मोठ्या प्रमाणात शासनाचे एवढे मोठे नुकसान करायचे हे सर्व नियोजनबद्ध संगनमत आहे व यासाठी अधिकाऱ्यांना दंडीत केलेच पाहिजे. याबाबतची जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांना दंडीत करावे असे मत समितीने व्यक्त केले. तसेच सर्वप्रथम तहसीलदारावर कारवाई करणे गरजेचे असून जनगणनेची अधिकृत आकडेवारी शासनाची आहे. लोकसंख्येसाठी दुसरी कोणतीही अधिकृत आकडेवारी नाही. कारण कोणतीही गोष्ट मान्य करीत असताना शासन जनगणना विचारात घेऊनच करते असे समितीने अवगत केले.

३.१५ याच अनुषंगाने महालेखाकारांनी असे निदर्शनास आणून दिले की, तहसीलदाराने त्या गावांची लोकसंख्या काढली तरीही कल्याण-डोंबिवली महापालिकेची लोकसंख्या १० लाखांपेक्षा जास्त आहे. यावर विभागीय सचिवांनी समितीस असे अवगत केले की, तहसीलदारांच्या पत्रामध्ये " सन २००१ च्या जनगणनेच्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राची ११ लाखांपेक्षा व कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रामधून वगळण्यात आलेल्या गावांची लोकसंख्या १ लाख ४० हजार एवढी आहे." यामध्ये जनगणनेनुसार असा उल्लेख केलेला नाही. महापालिकेमध्ये जनगणनेनुसार असे म्हणतात.

३.१६ यामध्ये लोकसंख्या जनगणनेनुसारच असून ही आकडेवारी कुठून आणली? संकेतस्थळावर आजही आकडेवारी उपलब्ध असेल ती तपासून घ्यावी. तहसीलदाराचे प्रमाणपत्र स्पष्ट आहे ११ लाख ९३ हजार ५१२ एवढी लोकसंख्या होती त्यामधून १ लाख ४६ हजार मान्य केली तरीही १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या आहे. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवून २७ गावांची लोकसंख्या जनगणनेनुसार असल्याबाबत तहसीलदारांनी म्हटले नाही असे सांगितले.

३.१७ ही आकडेवारी जनगणनेनुसार आहे का हे विचारण्यासाठी विभागाने त्यांना पत्र पाठविले का? It should be presumed. प्रत्येक वेळी विभागीय सचिव तहसीलदारांनी जनगणनेनुसार लिहिले नाही असे सांगत आहेत. तहसीलदारांनी दिलेली आकडेवारी बरोबर नाही परंतु विभागाने घेतलेले निर्णय बरोबर आहे असे विभागीय सचिव सांगत आहेत. तहसीलदारांनी त्यांच्या पत्रामध्ये जनगणनेनुसार असल्याचे नमूद केलेले असूनही विभागीय सचिव जनगणनेनुसार नसल्याचे सांगत आहेत. विभागाकडे असे कोणते पॅरामीटर्स आहेत? विभागाने जे अंदाजित सांगितले हे, पूर्णतः चुकीचे आहे. जनगणनेनुसार नसल्याचे सांगितले हेही चुकीचे आहे. तहसीलदारांच्या पत्रामध्ये " जनगणनेनुसार लोकसंख्या..... " असे स्पष्ट नमूद केले आहे. याला विभागाने योग्य प्रमाण म्हणून विचारात घ्यावे. याबाबत ज्यांना आक्षेप असेल, they will go to the Court. Why should we loose the revenue of the Government? All the amount should be recovered and the concerned officers responsible for the delay, misappropriation and misleading the department should be taken into consideration for enquiry and punishment. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

३.१८ ही सर्व कारवाई एक महिन्याच्या आत करावी आणि या सगळ्या रकमेची ३ महिन्याच्या आत वसुली करण्यात यावी. तसेच १० लाख रुपयाचा स्लॅब पकडण्याचा निर्णय कोणत्या स्तरावर घेण्यात आला? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शासन स्तरावर मंत्री महोदयांनी हा निर्णय घेतलेला आहे. त्यावर समितीने विचारणा केली की, मंत्री महोदयांनी मान्यता दिली पण लोकसंख्या १० लाख ४७ हजार आहे. १० लक्ष च्या खालचा दर लावावा असे विभागाने सांगितले काय? असे होत नाही कारण विभागाकडून नस्ती सादर करण्यात येते की, १० लक्ष पेक्षा खालची लोकसंख्या असल्यामुळे त्याला तेवढाच दर लावावा. यामध्ये नस्ती सादर करणाराच दोषी आहे शासनाच्या नियमाप्रमाणे आपण दर लावले पाहिजेत असे समितीने सुचित केले.

३.१९ खडकी कॅन्टोनमेंटच्या बाबत सद्यःस्थिती काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, याची वसुली झाली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले की, ही केस पी.एम.सी.ची आहे. या ठिकाणी पुण्याच्या ४ केसेस होत्या, त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, यात तीन केस ग्रामपंचायतीच्या होत्या आणि एक केस खडकीची होती त्याची पूर्ण वसुली झालेली असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले, तसेच ग्रामपंचायतीच्या बाबतीत स्लॅब प्रमाणे झाले आहे.

अभिप्राय व शिफारशी :

३.२० अभिप्राय :

The Maharashtra Potable Liquor (MPL) (Periodicity and Fees for Grant, Renewal or Continuance of Licences) (PFGRC) Rules, १९९६ नियमांच्या तरतुदीन्वये अनुज्ञप्ती शुल्काचे दर हे राज्य उत्पादन शुल्क आयुक्तांकडून विविध अनुज्ञप्तीकरिता सदर नियमांतील नियम ४ च्या कलम (i) अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करून दरवर्षी अधिसूचित केले जातात. अनुज्ञप्तीकरिता देय शुल्क हे मद्य विक्री दुकाने असलेले शहर, नगर वा गावाच्या लोकसंख्येच्या स्तरावर आधारित असते. सन २००१ च्या जनगणनेनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या (KDMC) अखत्यारीत असलेली लोकसंख्या ११,९३,५१२ होती. २००२ मध्ये ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अधिसूचनेनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून २७ गावे वगळण्यात आली. सन २००१ च्या जनगणनेनुसार या गावांची लोकसंख्या तहसीलदार, कल्याण यांनी १,४६,२१५ इतकी सुनिश्चित केली होती. त्यामुळे ही २७ गावे वगळल्यावर २००१ च्या जनगणनेनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची लोकसंख्या ही एकूण १०,४७,२९७ इतकी असताना व हा लोकसंख्येचा स्तर १० लाखापेक्षा अधिक असूनही, १३२ अनुज्ञप्तीधारकांच्या (FL II, FL III आणि CL III, CL/FL/TOD-III FL/BR-II) बाबतीत २०१०-११ या वर्षाकरिता अनुज्ञप्ती शुल्क हे १० लाखापेक्षा कमी लोकसंख्येसाठी असलेल्या दराने वसूल केले गेले. यामुळे रु. १.१० कोटी अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली झाली तसेच पुणे येथील रु. ५.५९ लाखांचे शुल्क कमी वसूल झाले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविले आहे.

३.२१ शिफारस :

यांसदर्भात समितीने साक्षीदरम्यान विस्तृत चर्चा केली असता महालेखाकारांनी हे लेखापरीक्षण सन २०११ - २०१२ या वर्षाचे केले आहे. त्यावेळी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील २७ गावांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येमधून वजा केली तरीही कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची लोकसंख्या १० लाखांपेक्षा जास्तच होते. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाने १३२ केसेसमध्ये अनुज्ञप्ती शुल्काची वसुली सी.एल. १,२, ३ व एफ.एल १,२, ३ च्या निकषानुसार करणे आवश्यक होते तसे न केल्यामुळे शासनाचे रु. १.१० कोटीचे नुकसान झाले असून ते वसूल करणे आवश्यक आहे असेच मत समितीने नोंदविले असता उपरोक्त नमूद लोकसंख्या ही अनुमानित असून ती जनगणनेनुसार नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. यावर महालेखाकारांनी संबंधित क्षेत्राच्या तहसीलदारांनी लोकसंख्येच्या संदर्भात सादर केलेले प्रमाणपत्र समितीसमोर सादर केले असता त्यात जनगणनेनुसार ही आकडेवारी निश्चित केल्याचे पत्रात स्पष्टपणे नमूद असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. व त्यामध्ये " कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या २७ गावांची लोकसंख्या " असे नमूद केले असून ती १,४६,२१५ एवढी दाखविण्यात आली आहे. परंतु तरीही ही आकडेवारी जनगणनेवर आधारीत नसून अनुमानित असल्याची दिशाभूल करणारी माहिती समितीसमोर सादर करण्यात आली. याबाबत समिती नापसंती व्यक्त करीत आहे. लोकसंख्येसंदर्भात जनगणना हा एकमेव आधार असून विभागाकडे ही लोकसंख्या निश्चित करण्याची दुसरी कोणतीही व्यवस्था नसतांना तहसीलदारांनी जनगणनेनुसार सादर केलेली आकडेवारी ग्राह्य धरणेच आवश्यक आहे.

लोकसंख्येची अधिकृत माहिती उपलब्ध असताना ती गृहीत न धरता केवळ परवाना धारकांच्या विनंतीवरुन ही अनुज्ञप्ती शुल्काची गणना करण्यात आली व यात शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, ही बाब निश्चितच गंभीर स्वरुपाची आहे.

हा सर्व घटनाक्रम पाहता वसूलीस पात्र असलेल्या १३२ परवानाधारकांपैकी काही परवानाधारकांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची लोकसंख्या १० लाखापेक्षा कमी असल्याबाबतचा अर्ज केला व त्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाने मान्यता दिली. लोकसंख्येसंदर्भात तहसीलदाराचे प्रमाणपत्र स्वयंस्पष्ट होते व ते विभागाने ग्राह्य धरणे क्रम:प्राप्त होते. या सर्व प्रकरणी चूक झाल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले व संबंधितांवर कारवाई करून रक्कम वसुली करणेबाबत देखील आश्वासित केले. अत: ज्या अधिकाऱ्यांनी या सर्व चुका केलेल्या आहेत व शासनाची दिशाभूल करून महसूल बुडविलेला आहे त्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून तात्काळ कारवाई करावी व १३२ परवाना धारकाकडून शुल्काची वसुली तात्काळ करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-अ

मंगळवार, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१७

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक, ७ नोव्हेंबर, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन सायं. ४.४० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(८) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(९) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१०) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(११) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

(१३) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

विशेष निमंत्रित :

(१४) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

(२) श्री. जी. के. पार्डीकर, वरिष्ठ उपमहालेखाकार, नागपूर कार्यालय

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार :

गृह (परिवहन) विभाग :

(१) श्री. मनोज सैनिक, प्रधान सचिव, परिवहन विभाग

(२) डॉ. प्रविण गेडाम, परिवहन आयुक्त, परिवहन विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या महसुली जमा क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ५.३.२ संदर्भात प्रधान सचिव, गृह (परिवहन) विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी २.१० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(७) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(८) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(१०) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :

श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

(१) श्रीमती वलसा नायर-सिंह, प्रधान सचिव, राज्य उत्पादन शुल्क विभाग

(२) श्रीमती प्राजक्ता लवगारे वर्मा, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या महसुली जमा क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ५.६.१ संदर्भात प्रधान सचिव, गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन सायं. ४.२० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(५) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(६) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.,

(७) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः

महालेखाकार कार्यालय :

श्री. राजदिप सिंह, महालेखाकार, नागपूर कार्यालय

वित्त विभाग :

श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, वित्त विभाग

साक्षीदार :

श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसूल विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या महसुली जमा क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ४.२.३ संदर्भात प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.०० वाजता सुरू होऊन सायं. ४.०० वाजता स्थगित झाली.

उपस्थिती

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(५) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(६) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-१२ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील गृह (परिवहन), गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेतला.

मंगळवार, दिनांक ६ मार्च, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे सायं. ५.०० वाजता सुरू होऊन सायं. ७.०० वाजता स्थगित झाली.

उपस्थिती

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-१२ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील महसूल व वन (महसूल) विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेतला.